श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

# बाणगंगा

**अंक ७ वा**

**सन २०१५-२०१६**

संपादक

**प्राचार्य डॉ. अशोक जाधव**

कार्यकारी संपादक

**डॉ. भाऊसाहेब मुळे**

**संपादक मंडळ**

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. शेख राजमोहंमद | प्रा. सौ. काळे वर्षा |
| प्रा. नागवडे प्रविण | प्रा. भुजबळ अमोल |
| प्रा. साठे भास्कर | प्रा. मोहिते चेतना |
| प्रा. पुंडे मनिषा | प्रा.डॉ. सौ. कीर्तने वर्षा |

प्रकाशक

**प्राचार्य डॉ. श्री. अशोक जाधव**

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

संपादकीय सल्लागार

**डॉ. विजय जाधव**

उपप्राचार्य
श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

---

सदर अंकात प्रसिध्द करण्यात आलेले लेख, कविता यातील मते संबंधित लेखक, कवींची आहेत.
या मताशी संपादक मंडळ, महाविद्यालय व संस्था सहमत असेलच असे नाही.

श्री बाणेश्वर शिक्षण संस्था

# विश्वस्त व कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | सभासदाचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | **श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले** | अध्यक्ष |
| २ | **श्री. विघ्नहर विनायक देशमुख** | उपाध्यक्ष |
| ३ | **श्री. गोरखनाथ दौलत साठे** | सचिव |
| ४ | **श्री. सोमनाथ तुळशीराम गुंजाळ** | सहसचिव |
| ५ | **श्री. त्र्यंबक हरीभाऊ कर्डिले** | खजिनदार |
| ६ | **श्री. बाळासाहेब त्र्यंबक वाघ** | सदस्य |
| ७ | **श्री. आसाराम तात्याभाऊ दुसुंगे** | सदस्य |
| ८ | **श्री. जनार्दन राधाकिसन कर्डिले** | सदस्य |
| ९ | **श्री. उत्तम चिमाजी जाधव** | सदस्य |
| १० | **श्री. भाऊसाहेब गंगाधर कर्डिले** | सदस्य |
| ११ | **श्री. प्रकाश कुंडलिक कर्डिले** | सदस्य |

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालयाची स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले | अध्यक्ष |
| २ | प्राचार्य डॉ. अशोक साहेबराव जाधव | सचिव |
| ३ | श्री. त्र्यंबक हरीभाऊ कर्डिले | सदस्य |
| ४ | श्री. गोरखनाथ दौलत साठे | सदस्य |
| ५ | श्री. सोमनाथ तुळशीराम गुंजाळ | सदस्य |
| ६ | श्री. उत्तम चिमाजी जाधव | सदस्य |
| ७ | प्रा. डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे | सदस्य |
| ८ | प्रा. डॉ. राजमोहंमद हसन शेख | सदस्य |
| ९ | प्रा. सौ. मनिषा नारायण पुंडे | सदस्या |

### * शिक्षकेतर प्रतिनिधी *

| | | |
|---|---|---|
| १० | श्रीम. शैला भगवान पाचे | सदस्या |

# श्रद्धांजली



या शैक्षणिक वर्षात जे जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ, कलावंत, साहित्यिक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत धुरंधर राजकारणी, संस्थेवर मनःपूर्वक प्रेम करणारे सहृदय, स्नेही, हितचिंतक, महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी त्यांचे आप्तेष्ट, विद्यार्थी दिवंगत झाले. अशा लाखो निष्पाप जीवांना संस्थेच्या व सर्व युनिटच्या वतीने



**भावपूर्ण...**

## श्रद्धांजली

# प्राचार्यांचे मनोगत....

विद्यार्थी बंधू-भगिनींनो,

बाणगंगा या वार्षिक नियतकालीकाचा सातवा अंक आपल्या हाती देतांना व त्याव्दारे आपणाशी संवाद साधताना मला विशेष आनंद होत आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत बुऱ्हाणनगरचे आराध्यदैवत आई तुळजाभवानीच्या आशीर्वादाने शैक्षणिक विचारांची शिदोरी बरोबर ठेवत बहुजन समाजाच्या उध्दाराचे स्वप्न उराशी बाळगुन मा. आ. शिवाजीराव कर्डिले यांनी १९८९ साली श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना केली. अल्पावधीतच ज्ञानाची गंगोत्री बुऱ्हाणनगरमध्ये प्रवाहित केली. प्राथमिक,माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची वन वन थांबवून शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले केली व अल्पावधीतच या संस्थेने मोठी प्रगती साधली याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री बाणेश्वर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय होय.

जुन २००४ मध्ये अवघ्या ५७ विद्यार्थी व ६ प्राध्यापकांवर सुरु झालेल्या या महाविद्यालयात सध्या ८५१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ३२ प्राध्यापक ज्ञानदानाचे कार्य करत आहेत.

बदलत्या प्रवाहाचा मागोवा घेत महाविद्यालयाने पारंपरिक उच्च शिक्षणाबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत. नवनवीन अभ्यासक्रमाव्दारे उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता टिकवत असतानांच ग्रामीण भागातील आमचा विद्यार्थी खासगीकरणाच्या युगात २१ व्या शतकात आव्हाने पेलण्यास समर्थ बनला पाहिजे. ही भूमिका स्वीकारुन यासाठी आम्ही आवश्यक ती कौशल्ये, मुलाखत तंत्र, सामान्य ज्ञान, सॉफ्टस्कील डेव्लहपमेंट प्रोग्राम सारखे उपक्रम राबवित आहोत. ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षण पूर्ण करता यावे, त्यांच्यात श्रमसंस्कार रुजावेत, यासाठी ‘कमवा व शिका’ योजनेंतर्गत शिक्षण पूर्ण करण्याची संधी महाविद्यालयाने दिली. या बरोबरच विद्यार्थी कल्याण मंडळाच्या सर्व योजना व उपक्रमांमध्ये महाविद्यालय सहभागी होऊन नव भारताचे भावी आधारस्तंभ सक्षम करण्याचा महाविद्यालय प्रयत्न करीत आहोत.

या वर्षीचा ‘बाणगंगा’ हा सातवा अंक साकार करण्याचा आम्ही प्रयत्न केला. संस्थेच्या सहकार्याने प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे या अंकाची निर्मिती झाली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साहित्यीक गुणांना वाव देण्यासाठीचे चांगले व्यासपीठ आहे व त्यात विद्यार्थी उत्स्फुर्तपणे सहभागी होतात,हे पाहून आनंद वाटतो.

अशा या बाणगंगा च्या सातव्या अंक निर्मितीसाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षणप्रेमी व्यक्तींनी सहकार्य केले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

धन्यवाद !

**डॉ. अशोक जाधव**
**प्राचार्य**

# संपादकीय...

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शिवाजीराव कर्डिले व इतर संचालक मंडळ यांनी सन १९८९ साली केली. या माध्यमातून सर्वप्रथम माध्यमिक शाळा सुरु केली. नंतर उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु केले. पंचक्रोशीतील इतरही ठिकाणी शिक्षणाची गरज पाहता त्याही ठिकाणी माध्यमिक शाळा सुरु केल्या.

उच्च शिक्षणाची मागणी आणि विशेषत: मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून या संख्येने सन २००४ साली श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयाच्या माध्यमातून अनेक गरीब मुलामुलींना, उपेक्षित घटकातील व खेड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळू लागले. या शिक्षणातून सर्वच घटकातील विद्यार्थ्यांचे जीवन समृध्द होण्यास मदत होत आहे हे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीतून सिध्द होताना दिसते.

महाविद्यालयीन युवक हा उद्याच्या पिढीचा सुजाण नागरिक असतो. उच्च शिक्षणाने त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असतात. समाजात घडणाऱ्या घटनांकडे तो स्वत:च्या नजरेने पाहत असतो आणि त्याचा अन्वयार्थ स्वत:च लावण्याचा प्रयत्न करीत असतो. या महाविद्यालयीन युवकांपुढे अनेक प्रकारचे माहितीचे मायाजाळ आहे. त्याच्या भोवती घडणाऱ्या सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक आणि वैयक्तिक घटनांचा त्याच्यावर अनुकूल प्रतिकूल परिणाम होत असतो. या घटनेच्या निरीक्षणातून त्याची वैचारिक बांधणी होत असते. हाच विचार शब्दबध्द करण्याचा अनेकदा तो प्रयत्न करीत असतो. मात्र त्याला व्यक्त होण्यासाठी विचारपीठ उपलब्ध होत नाही. त्याच्या या वैचारिक भावना व्यक्त करण्यासाठीच महाविद्यालयाचे हे नियतकालिक असते.

या नियतकालिकातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपापल्या भावभावना लेख, काव्य अथवा छोटाश्या चुटकुल्यातून व्यक्त केल्या आहेत. वैयक्तिक भावभावनांसोबत सामाजिक, राजकिय, शैक्षणिक विचारांवरही भाष्य व मंथन यात आले असून ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरणारा हा विद्यार्थी, वैज्ञानिक प्रगतीचा शोध बोधपर विचारही या नियत कालिकात मांडू लागला आहे. जीवनाच्या विविध अंगांचे दर्शन आपल्या लेखाच्या व कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घडविले आहे.

महाविद्यालयाच्या हा सातवा वार्षिक अंक आहे. या अंकातील विविध लेखांचा आपण आस्वाद घ्यावा हीच सर्व संपादक मंडळाची इच्छा आहे. म्हणूनच हा अंक अधिकाधिक आकर्षक बनविला आहे. या अंकासाठी संपादक मंडळातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतलेले कष्ट व परिश्रम स्तुत्य आहेत. त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देतो.

**कार्यकारी संपादक**
**प्रा. डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे,**
**मराठी विभाग प्रमुख**

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालय शिक्षक व शिक्षकेतर वर्ग २०१५-२०१६

प्रा. डॉ. अशोक जाधव (प्राचार्य)

समाजशास्त्र विभाग
डॉ. जाधव व्ही. एम. (उपप्राचार्य)

मराठी विभाग
प्रा. डॉ. मुळे बी. एम.
प्रा. डॉ. कीर्तने व्ही.एस.

वाणिज्य विभाग
प्रा. गाडे पी.डी.
प्रा. दरेकर ए.व्ही
प्रा. पूनम बेद्रे
प्रा. के.एस. जाधव

बी.सी.ए. विभाग
प्रा. अमोल भुजबळ
प्रा. दिवटे मॅडम
प्रा. दारुणकर प्रेरणा

लेखाधिकारी
श्री. विधाते ए.बी.

परीक्षा विभाग
श्रीमती पाचे शैला

हिंदी विभाग
प्रा. डॉ. शेख आर.एच.
प्रा. राणी केदार

इतिहास विभाग
प्रा. सोनवणे एस.आर.
प्रा. औटी सर

बी.सी.एस. विभाग
प्रा. काळे व्ही. ए.
प्रा. महाजन आर.एस.
प्रा. वाबळे सुप्रिया
प्रा. तृप्ती बोंदर्डे
प्रा. योगेश ढगे

ग्रंथालय विभाग
प्रा. राउत सर

शिपाई
श्री. कर्डिले एस.वाय.
श्री. नवनाथ साळवे
श्री. योगेश थोरवे
श्रीमती लोखंडे जे.एल.

प्रा. नागपुरे योगेश

इंग्रजी विभाग
प्रा. नागवडे पी.सी.

भूगोल विभाग
प्रा. साठे बी.जी.

राज्यशास्त्र विभाग
प्रा. खांदवे एस.टी.

क्रीडा विभाग
प्रा. पुंडे एम.एन.

बी.एस्सी. विभाग
प्रा. मोहिते चेतना
प्रा. धिमन मॅडम
प्रा. वाघ मॅडम
प्रा. लहारे मॅडम
प्रा. बांगरे सर
प्रा. गिते मॅडम
प्रा. कुलकर्णी मॅडम
प्रा. शिंदे मॅडम
प्रा. नामदे मॅडम

# बाणगंगा

## सन २०१५-२०१६

## अनुक्रमणिका


| विभाग | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| मराठी | ११ |
| हिंदी | ४१ |
| अहवाल | ५३ |

# मराठी विभाग

# महिला सबलीकरण...



आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये नारीला अनोखे महत्त्व प्राप्त झालेले आहे. वेद स्थान उपनिषदांनी या नारीला स्त्रीशक्तीचे दिलेले आहे. जीवनात कोणतीही तत्त्वे स्त्री शिवाय पूर्ण होवू शकत नाही. हे आतापर्यंत अनेक महिलांनी दाखवून दिले आहे. जसे मैत्रीय गार्गी, माँसाहेब जिजाऊ, झाँशीची राणी, इंदिराजी, किरण बेदी, सुनिता विल्यम या महिलांमध्ये प्रेम, त्याग, नम्रता, तेजस्विता, तपस्विनी, जिद्द, ध्येय या गोष्टी होत्या यामुळे महिला आपल्या जीवनात यशस्वी ठरल्या.

म– महान

हि– हिंमतवान

ला– लाजवंती

वरील उक्तीप्रमाणे हे सर्व गुण महिलांमध्ये आल्यास त्या आपल्या जीवनाची वाटचाल यशस्वीपणे करु शकतात. महिला ही खरोखरच महान आहे. तिचे आचार, विचार, ज्ञान, कृती, संघटन या विचारांनी तिला महान बनविले आहे. प्रत्येक काम सिद्धिस नेण्याकरिता तिच्या मनगटात दम ठेऊन ती जीवनाचा प्रवास चालवत असते. हे सर्व सांभाळतांना धार्मिक संस्कारांचा आधार घेत आपल्या चारित्र्याला, शिलसंवर्धनाला काचेच्या भांड्याप्रमाणे जपत असते. मानवी जीवनाचा आधार म्हणजे कुटुंब जीवनाचा आधार म्हणजे स्त्री......

पुरुष व स्त्री प्रकृतीचे दोन अंगे आहेत ती दोन्ही मिळून पुर्ण होतात. म्हणुन स्त्री ही भगवंताची उत्कृष्ट कलाकृती आहे. जेव्हा स्त्रीचे समर्पण व पुरुषाचे कतृत्व एकत्र येतात तेव्हा तो संसार होतो. यज्ञात सहकार्य देणारी पत्नी गृहिणी म्हणून राहिली तर घर हे खऱ्या अर्थाने घर बनते.

हे सर्व लिखाण कागदावरच राहिले पण अशा या लक्ष्मीरुपी महिलांकडे फक्त स्वार्थाच्या रुपाने पाहिले जाते. भोगदासी व कामदासी एवढीच त्यांची ओळख असते. आजच्या असुरी प्रवृत्तीच्या माणसाने तिला हातात खेळणारं बाहुलं बनवलं आहे. समाज कितीही ओरडत असला तरी स्त्री मुक्त झाली, तिला आरक्षण दिले, पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळाले हे फक्त वरच्या–वरच आहे. जो पर्यंत हार्ट टू हार्ट हा विचार जाणार नाही तो पर्यंत खऱ्या अर्थाने स्त्री ही मुक्त होवू शकणार नाही. एखाद्या वेलीला काठीचा आधार मिळाला तर ती सरसर वर जावू शकते. त्याचप्रमाणे महिलांना कुटुंबातुन, समाजातून उत्स्फुर्तपणे दबावाखाली न राहता आधार मिळाला तर ती जग बदलू शकते. 'स्वामी विवेकानंदांनी' म्हटले होते 'Give me hundred of Nivedita' मला दिले तर जग बदलून टाकेल ती ताकद, हिम्मत या नारीमध्ये आहे.

**– भिंगारदिवे प्रगती राजेंद्र**

**एफ.वाय.बी.एस.स्सी.**

# गाडून टाका या हुंडा पद्धतीला

आपल्या भारत देशात हिंदू संस्कृतीमध्ये हुंडा पद्धती ही प्रथा रुढ आहे. आजही हुंड्यामुळे अनेक नववधु बळी पडत आहेत. एकदा वर्तमानपत्रात मी वाचले की एका अलिशान बंगल्यातील कुटुंबाची गृहलक्ष्मी असलेली सुन हुंडाबळी ठरली. मनात विचार आला कि, या बंगल्यातील मंडळींना धनाची इतकी अधिक हाव का बरे सुटावी ? मोठ्या थाटामाटात विवाह करुन आपल्या घरी आणलेल्या एका निरागस मुलीचा त्यांनी धनासाठी का बरे बळी घेतला ? सहिष्णूता व औदार्य यांसाठी प्रसिद्ध असलेल्या आपल्या या भारतात अशा दुर्देवी घटना वारंवार का बरे घडाव्यात ?

हुंड्याचे हे जहर पिढ्यान्‌पिढ्या आपल्या समाजात भिनले आहे. त्यामुळे मुलगी जन्मास आली कि, आई–वडिलांच्या काळजाचा ठोका चुकतो. मुलीला जन्म देणाऱ्या स्त्रीकडे उपेक्षेने पाहिले जाते. कित्येक गरीब घरातुन तर या हुंड्याच्या रुढीपायी कित्येक मुली अजन्म अविवाहित आहेत.

जग जसे प्रगत होईल, शिक्षणाचा जसा प्रसार होईल तसा हा हुंड्याचा त्रास निश्चित कमी होईल अशी आपल्याकडील विचारवंतांची कल्पना होती. पण त्यांची ही आशा फोल ठरलेली दिसत आहे. आज शहरातून तरी शिक्षणाचा खूप प्रसार आहे. मुली पदवीधर झाल्या आहेत. स्वत: कमवू लागल्या आहेत. तरीपण समाजाची हुंड्याची हाव काय सुटली नाही. उलट मुलगी जास्त शिकलेली असेल तर जास्त हुंडा द्यावा लागतो. सध्या हुंडा वेगवेगळ्या स्वरुपात दिला–घेतला जातो. मुलाच्या शिक्षणाचा खर्च, वरदक्षिणा, दागदागिने, मानपान, राहण्याची जागा, वाहन, टि.व्ही., फ्रिज अशा विविध रुपात



हुंडारुपी भस्मासूर थैमान घालत असतो.

या जीवघेण्या हुंडापद्धतीला आळा कसा घालायचा हा एक यक्ष प्रश्न आहे. आपल्याकडे १९६१ पासुन हुंडा प्रतिबंधक कायदा लागू झाला आहे. पण हा कायदा अपुरा पडतो असे दिसून आले आहे. त्यातून अनेक पळवाटा निघतात. शिवाय हुंडा घेणाच्या गुन्हा करणाऱ्यांना फार सौम्य शासन आहे. म्हणून या कायद्यात सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. मात्र केवळ कायदा करुन या अनिष्ट प्रथांना आळा घालता येईल काय ? खरे म्हणजे त्यासाठी फार मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधनाची आवश्यकता आहे. समाज परिवर्तन व्हायला हवे. काही महिला संघटना आपल्या परिने प्रयत्न करत आहेत. पण बहुसंख्य हुंडाबळी प्रकरणांमध्ये सासु, नणंद अशा स्त्रियाच कारणीभूत ठरल्या आहेत. हे एक विदारक सत्य आहे. त्यामुळे समाजाने पुढाकार घेऊन हुंडा पद्धती गाडून टाकायला हवी.

**– कराळे मनिषा गंगाधर**
**(एस.वाय.बी.कॉम.)**

# स्त्री भ्रूण हत्या : एक अभिशाप



स्त्री–पुरुष समानतेबद्दल कितीही घसाफोड करुन सांगितलं, तरी झपाट्यानं घटलेलं मुलींचे प्रमाण या समानतेचा दावा हाणून पाडतं. मुलगाच हवा हा हट्ट काय सांगतो ? मुली गायब होतात तरी कशा ? आज केवळ मुली वाचवा म्हणुन चालणार नाही. गर्भलिंग निदान व निवडीच्या बाबतीतला कायदा अधिक सक्षमपणे राबविला जाण्याची गरज आहे. केवळ शपथा घेऊन ही परिस्थिती बदलणार नाही. ही मानसिकता अनेक शतकांची आहे. त्यामुळे या मानसिकते विरुध्द् सुरु झालेला हा संघर्ष लगेचच यशस्वी होईल अशी कोणतीच खात्री देता येत नाही. पण तरीही पुरुषप्रधान संस्कृतिचं हे बधिरत्व गळून पडेल आणि ही परिस्थिती बदलेल अशी आशा आहे.

तिने घर समर्थपणे सांभाळलंच होतं पण तिचा पाय उंबरठ्याबाहेर पडला आणि तिने आकाशही सहजच पेललं. तिने राजकारणामध्ये स्वतःचं अस्तित्व सिद्ध केलं, मल्टीनॅशनल कंपन्यांचा कारभार समर्थपणे हाकायला सुरुवात केली, संशोधनाच्या क्षेत्रात भरारी घेतली, खेळामध्ये वर्चस्व सिद्ध केलं. खरं तर तिला भरारी मारायला आकाशही कमी पडू लागलं. कर्तृत्व सिद्ध करण्याची प्रत्येक संधी स्विकारत तिने स्वतःच शक्तीरुप दाखवून दिलं. त्यासाठी कधी तिने संघर्षही केला. स्वतःचं कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी संघर्ष तिने कधीच नाकारला नाही. पण तिला स्वतःच्या अस्तित्वासाठीही संघर्ष करावा लागतो आहे. कुठे गर्भात असतांनाच तिचा शोध घेतला जातोय. त्या गर्भाच्या उबदार वातावरणाबाहेर तिला उचकडून काढुन फेकलं जातंय. समाजामध्ये मिरवतांना गुन्हेगार कसा कलंक माथी लागू नये म्हणुन तिला जन्माच्या आधीच मोठ्या प्रमाणावर गुपचुप पणे मारलं जातंय. त्यासाठी तिला गर्भात वाढवणारी आईही स्वतःचे आणि जन्म घेणाऱ्या लेकीचे अश्रू पिऊन समाजाबाहेर डोळे कोरडे ठेवते. तर कुठे जन्मानंतरही तिला मारलं जातंय. ती कधी उकीरड्यावर एखाद्या प्राण्याच भक्ष्यही सहज होते. कधी तिच्या शरीरात काचा घुसतात तर कुठे तडफडणाऱ्या त्या जीवाला मुंग्या खातात. हे वास्तव आहे, आपल्याच आसपासचं, तिच्या अवघ्या काही दिवसांच्या जगण्याचा हा भयंकर शेवट.......

**– ओगले मेघना, (एफ.वाय.बी.एस्सी.)**

**सत्य वचन**

**प्रत्येकामध्ये काही चांगले, काही वाईट गुण असतात. आपण जर फक्त चांगल्या गुणांचं कौतूक करुन त्यांना वाव दिला ना तर वाईट गुण कधी मागे पडतात कळतही नाही**

# जगात चांगली माणसं असतात....

''जिद्द असेल तर ते
आकाश ही ठेंगणं वाटतं
हे केवळ सांगायला ठिक वाटतं
परंतू आपल्या महाविद्यालयाकडे
पाहिलं कि, जणू खरं वाटू लागतं
कारण हेच कि, जगात
चांगली माणसं असतात''.

प्रिय मित्रांनो नमस्कार. जीवन जगण्याची कला ज्यांनी आत्मसात केली त्यांनी जग जिंकलं असं म्हटलं तर काही हरकत नाही. जीवन जगत असतांना आपल्याला अनेक माणसांचा सहवास लाभत असतो हे खरेच असते. अनेक वाईट,चांगल्या परिस्थितीमध्ये आपल्याला जगावं लागतं, संघर्ष ही करावा लागतो. पण जीवन जगणं सोपं की कठीण हे आपणच ठरवावं लागतं. ''वामनराव पै'' यांच्या विचारांशी सहमत असावं असं वाटतं. ते म्हणतात – 'तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार आहेस'. हे खरेच आहे. शिक्षण घेत असतांना आपणास बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागते. पण जो खऱ्या अर्थाने या अडचणींचा सामना करतो, या संकटांना समर्थपणे तोंड देतो, तोच आज या अधुनिक जगाचा 'शिल्पकार' ठरतो.

मित्रांनो, काळ बदलत चालला आहे. माणुसकीचं नातं मात्र पैशांमुळे बंद झाले आहे. खुप माणसं ही पैशाच्या मागे धावत आहे. माणसासाठी माणुस म्हणुन माणसानं माणुसकी गमावली आहे. स्वार्थासाठी जीवन जगण्याचा आनंद लोक आज घेऊ पहात आहे. पण, खरं सांगायचं तर खूप 'शिका' शिक्षणानेच माणुस घडतो. विचार बदलले कि, नशिब बदलते हे खरे आहे.



कठिण परिस्थितीत आपण शिक्षण घेत असतो. हे मी अनुभवले आहे. सतत परिश्रम, जिद्द, आत्मविश्वासाने, प्रयत्नाने कोणताही माणुस मागे राहू शकत नाही. विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन, इंटरव्ह्यू देत राहणं हे महत्वाचे कार्य आहे. हे खरं आहे की सर्व ठिकाणी चांगली माणसं भेटतील असं नाही, म्हणून खचून जावू नये, चांगलं काम करुन जग जिंकता येतं.

महात्मा गांधींप्रमाणे 'सत्य' आणि 'अहिंसा' जपली कि, जीवन सार्थक व्हायला लागतं. आज गांधीजी नाहीत, पण त्यांचे विचार मात्र आपण आजही आत्मसात करतो आहेच, त्यांची कामे चांगली आहेत म्हणून नोटांवरही गांधीजीच दिसतात हे काय आहे ? हेच खरं आणि चांगलं काम आहे; सत्य हे नेहमी कटू असतं;

म्हणुनच मृत्युंजय कादंबरी मध्ये म्हटलं आहे कि,

''सत्य हे पाहणाऱ्यांच्या वा ऐकणाऱ्यांच्या ईच्छेचा विचार कधीच करीत नसतं, ते जसं असतं तसं पुढे येत असतं उगवत्या सूर्यदेवा सारखं.....

मला लाभलेली संगत आणि थोरा मोठ्यांचे आशिर्वाद या सर्वांची अपेक्षा पूर्ण करण्यातच मला

जीवनाची खरी सार्थकता वाटते. म्हणूनच वाटतं कि, काहीतरी चांगलं करावं आणि उमलत्या कळीप्रमाणे चांगल्या विचारांची एक आणि अनेक पाकळ्यांची फुले तयार करावी आणि असे काही संकट येत असतांना ही कोणीतरी चांगला माणूस जो आपल्या सोबत नसतो पण आपण केलेल्या सर्व काही कामांचा पाठपुरावा करतो व स्वइच्छेने संकटकाळी मदतीचा हात देतो.

काही माणसांचा सहवास देखील जीवनाची दिशा बदलून टाकतो. अशीच चांगली माणसं, माझ्याही जीवनात आलेत. त्यांनी मला माझ्या चुकांची जाणीव करुन दिली, मार्गही दाखवून दिला, खरंच असतं हे कि, जेव्हा अशी चांगली माणसं आपल्या जीवनात येतात. म्हणूनच वाटतं.......

''निष्ठापूर्वक कष्टांना योजनेचा वास हवा,
प्रेरणाच्या पंखांना श्रृजनतेचा ध्यास हवा,
असे काही घडल्यावर जीवनात, नवल काही घडते
असामान्यातून मात्र – सामान्य फुलते''

म्हणूनच, जीवन जगत असतांना मला व तुम्हाला मिळालेली माणसं ही आपल्या यशाचे मानकरी असतात.

त्यांना कधी विसरु नका, ज्यांनी तुमच्या जीवनात परिवर्तन केले, आई-वडिल तर देवच असतात. असे काही खरे विचार मांडतांना डोळ्यात पाणी येते आणि मनात प्रश्न येतो कि, जगात चांगली माणसं असतात पण त्यांचा सहवास मात्र क्षणभरच असतो. असेच सारखे सारखे वाटते.....

**– प्रा. राऊत दत्तात्रय विलासराव**
**(ग्रंथपाल,एम.ए.बी.एड. (हिंदी))**

# आई...



वळवाच्या पावसासारखं तुझं प्रेम
जगण्याची एक आशा देऊन गेलं ।।
त्यानं मात्र काळजाला चटका
बसल्यासारखं वाटलं.
कल्पवृक्षाची सावली समृध्दीची माऊली
खरंच आईचं नातं
तिची करुन ममतेची माया
वात्सल्यभाव जपून ठेवतं
वळवाच्या पावसासारखं तुझं प्रेम
जगण्याची एक आशा देऊन गेलं ।।
भल्या माणसा ऐक गोष्ट तू
हे माझे अन् ते माझे
या भूलावणीमध्ये राहू नको
किती जरी झाला मोठा
आई नावाला तोलू नको
आई नावाला विसरु नको
वळवाच्या पावसासारखं तुझं प्रेम
जगण्याची एक आशा देऊन गेलं ।।
झालो पोरका मी आज या धरणी
माऊली मज गेली आज सोडूनी
लहानपणी केले तिने पालन
हृदयाचे खुले केले दालन
वळवाच्या पावसासारखं तुझं प्रेम
जगण्याची एक आशा देऊन गेलं ।।

**– हरिओम सुभाष नागरे**
**(एफ.वाय.बी.एस्सी.)**

# नगरचे वास्तूवैभव.....

अहमदनगर जिल्हा इतिहासाची साक्ष देणारा आहे. अहमदनगर नाव उच्चारल्यास आठवते निजामशाहीची राजधानी. १०० वर्षांमध्ये मध्यमवर्गीय महाराष्ट्राचा इतिहास घडला. केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील सुंदर शहरांमध्ये अहमदनगर चे नाव उच्चारले जाते.

वास्तूवैभव : – अहमदनगरचा राजा निजामशहाने सिना नदी काठी हे नगर स्थापलं ते २८ मे १४९० मध्ये. अहमदशहाने जहांगिरखानचा पराभव करुन एक कोट उभा केला. अवघ्या चार वर्षात ही राजधानी उभी राहिली. जवळच भिंगार हे व्यापारी केंद्र होते. नगरच्या जवळ पूर्वी अनेक गावे होती. (भिंगार, शहापूर, नागरदेवळे, नालेगाव, ससेवाडी हे नगरच्या जवळ होते) १६५६ रोजी निजामशाही संपुष्टात आली व त्या वास्तू अजुनही येथे आहेत. उत्तरेला सावेडी उपनगरात अहमदशहाने हस्त–बेहस्त महाल बांधला. वडगांव शेंडी तलावातून या ठिकाणी पाणी सोडले जायचे. बुऱ्हाणनिजामशाह येथे राहत असे. बुऱ्हाणशाह हा येथील दुसरा बादशाह होता. सुख देणारा १६व्या शतकात फरहाबक्ष महाला बांधण्यात आला याची कल्पना बुऱ्हाणबादशाहची होती. आग्राच्या ताजमहालाची कल्पना ही अहमदनगरच्या फर्याबागची आहे. याचं वैशिष्ट्य सांगायचे झाले तर इथली प्रकाश योजना, ध्वनी व्यवस्था, इथलं वातावरण अल्हाददायक आहे. नगरमध्ये सर्जेखानने अनेक वेशी बांधल्या. नालेगाव, तोफखाना, माळीवाडा अशा अनेक वेशी बांधल्या परंतु काही वेशी काळाच्या ओघात पडून गेल्या. वास्तू वैभवात बुऱ्हाणनगरच्या रस्त्यावर दमडी मशीद आहे. पूर्वी



दमडी या किंमतीचे नानं होतं. लोक येथे बसणाऱ्या एका बाबाला हे नानं भिक्षा म्हणून देत असत. तेथे नगरच्या बादशाह याने दमडी प्रकारची नानी घेऊन त्याची तेथे त्या पैशात मशीद बांधली. इस्लामी वास्तूशास्त्राची ही वास्तू संपूर्ण दगडाची आहे. दमड मशिदीवर घुमट नाही. समोर कमान आहे. कुराणातील वचन या भिंतीवर कोरलेले आहेत. सौदर्यापेक्षाही भक्कमपणा हा अहमदनगर शहरामध्ये आहे. दगडात कोरलेले कमलपुष्प आहे. दारात व आतल्या बाजूस कमळाच्या पाकळ्या कोरलेल्या आहेत. छत हे सपाट आहे ते घुमटाकार नाही. मशीदीच्या मागच्या बाजुला ख्रिश्नच, मुस्लीम यांचे कब्रस्थान आहे. आग्राच्या ताजमहालाइतकं हे गोल घुमट नाही ते साधंच आहे. परंतू हे इथल्या मातीत याची आठवण अजूनही काही पिढ्यांना याची पूर्वीची माहिती देते.

दूर डोंगरावरील वास्तू चांदबिबी ही आहे. हा महाल अष्टकोणी आहे. तो राहण्यासाठी बांधलेला नाही. १५०० रोजी हा महाल बांधला सलाबतखानाने बांधला. दूर्बीन महाल म्हणुनही हा महाल ओळखला जात असे. सलाबतखानाची कबर ही चांदबिबी येथे आहे. सलाबतखानाला येथे टेहळणी करायची होती. येथील बांधकाम

समुद्रसपाटीपासून १८ हजार फुट उंचीवर आहे. फारसं काही नक्षिकाम नसलेली ही वास्तू अतिशय उत्तम आहे. तळघरात सलाबतखानाची कबर आहे. केवळ चुन्याने बांधलेल्या चिरेबंदी आहेत. २० फुटांच्या कमानी आहेत. प्रत्येक मजल्यावरुन अहमदनगर शहर दिसते. श्रावणात या महालाचे वास्तव्य व सौदर्य खूप छान दिसते.

अहमदनगर पासून २० कि.मी. अंतरावर वांबोरी रस्त्यावर मांजरसुंबा येथे ही महाल आहे. या परिसरावर नजर ठेवण्यासाठी महाल बांधण्यात आला आहे. अहमदशहाने आपल्या काळातही घुमटाकृती वास्तू आपल्या विश्रामासाठी बांधली. अतिशय मध्यभागी घुमटाकार आहेत. शेजारीच पिरॅमिडच्या आकाराचे घर आहे. तेथे निजामशाहीचा झुलता दिवा कोरलेला आहे व कुराणातील काही वचने कोरलेली आहेत. बागरोजाच्या बाजूस एक चबुतरा आहे त्या ठिकाणी एक गुलामली हत्तीची कबर आहे. औरंगजेब म्हणजेच ८८ वर्ष मोघल बादशाह येथे मुक्कामाला होता. २१ फेब्रुवारी १७६० मध्ये त्याचा शेवट झाला. औरंगजेबला अलमगीरमध्ये अंघोळ घालण्यात आली होती. त्यामुळे अलमगीर येथे त्याची समाधीस्थान आहे. आज या ठिकाणी धार्मिक शिक्षण देण्याचे काम चालु आहे. अहमदनगरमध्ये ४० शिलालेख मिळाले. सर्वात जुना शिलालेख नागरदेवळे येथे मातीच्या किल्ल्यावर सापडला. आता तो ब्राह्मण गल्लीत आहे.

पाणी : – बाईजाबाई जेऊर येथील ससेवाडी येथे सिना नदीचा उगम होतो. दगडी नंदीच्या तोंडातून पाणी पडते. सिनेचा पूर मोठा नसतो. पण तिने उग्र रुप धारण केले तर ती कोणाचाही नसते. १५६२ मध्ये विजयनगर व विजापूरच्या राजाने आक्रमण केले तेव्हा निजाम



एकटा पडला होता. शत्रू सैन्य सिनेच्या पात्रात तळ ठोकून बसले तेव्हा सिनेला अचानक पूर आला व शत्रूला पळता भूई थोडी झाली. नगर शहराच्या पूर्वेला व उत्तरेला पडणाऱ्या गर्भगिरी डोंगरातील पाऊसाचे पाणी सिना नदीच्या पात्रात येते. नगर हे शहर सर्वत्र उंच बाजूने आहे. त्यामुळे तेथे पाण्याची उपलब्धता करणे गरजेचे आहे. अहमदशाहच्या काळात डोंगराचे सर्व पाणी चारीद्वारे एकत्र करुन ते सिना नदीत सोडण्यात आले. नगरला कारंजे व वेगवेगळे हौद, नळांद्वारे ते येवू लागले. कापूरवाडी तालवाचं पाणी किल्ल्यामध्ये सोडलं जात असे. किल्ल्यातील उद्याने व कारंजे यासाठी हे पाणी वापरले जाई. नगरला पाणी कमी पडू नये यासाठी गंगा, जमुना या विहिरी बांधण्यात आल्या. फराहबक्ष महालासाठी भिंगार नळ तयार करण्यात आला. शहापूरच्या मशिदीजवळ या नळाचे अवशेष आहेत. डोंगराचे पाणी एका ओढ्यात अडवून ते पाणी शहापूरजवळून भिंगार येथे नळ तयार करुन ते पाणी फराहबक्ष महालामध्ये जाण्यासाठी सोय केली होती. निजाम नंतर मोघलांच्या काळात १५०० मध्ये वडगाव, कापुरवाडी, नागाबाई, शेंडी, वारुळवाडी काही वर्षे या नळाचे पाणी सर्वांना जात असे. अनेक ठिकाणी जुन्या पाणीयोजना आढळतात.

**– पानमळकर पुष्पा जगन्नाथ**
**(टी.वाय.बी.ए.)**

# मोबाईलचा सदुपयोग......



माणसाद्वारे जे तंत्रज्ञान तयार केले गेले आहे ते सध्या माणसांच्या विनाशाचे कारण बनले आहे. काही वाईट, दुष्ट प्रवृत्तिचे लोक आणि असामाजिक घटक सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करुन समाजात अशांती निर्माण करीत आहे. विविध संदेश प्रणाली आणि वेबसाईटसच्या गैरवापर केल्यामुळे त्यावर मर्यादा आल्या आहेत. माझ्या मते, अशा सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर माणसाच्या स्वातंत्र्याला काहीही आणि कुठल्याही प्रकारची हानी पोहोचवू शकत नाही. सुधारित तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या मार्गाने केल्यास महान गोष्टीही साध्य होऊ शकतात. आपण आपल्या पध्दतीने शक्य होईल, तितकी सुधारीत तंत्रज्ञानाची माहिती लोकांपर्यंत पोहोचविली पाहिजे. जर आपल्यासारख्या तरुण पिढीने हे तंत्रज्ञान योग्य पद्धतीने वापर केल्यास आपल्याला पोलिस आणि प्रसार माध्यमांची कमी गरज पडेल.

सध्याच्या जागतिक बँकेच्या रिपोर्टमध्ये असे नमुद केले आहे कि, गतीमान तंत्र फक्त माणसाला सत्ता आणि अधिकारच देत नाही तर याचा परिणाम आर्थिकदृष्ट्या उत्तेजक वाढ, उत्पादन याचावर होतो आहे. गतिमान तंत्रज्ञान अनेक गोष्टी विकसीत करण्यास मदत करत आहे. फक्त ह्याच गतिमान ॲप्लीकेशनमुळे माणसांच्या जीवनशैलीत आणि राहणीमानात अमुलाग्र बदल झाला आहे. सध्या जगात सुमारे सह अब्ज लोक मोबाईल फोन वापरतात, भारतात ९०३.२७ दशलक्ष लोक मोबाईल फोन वापरतात. आणि त्यातील २३% हे ग्रामीण भागातील आहेत. मोबाईल संभाषणामुळे माणसाचा विकास होण्यास खूप मोठी संधी मिळाली आहे की, ज्याच्या वापरामुळे आपण शिक्षण, आरोग्यविषयक माहिती मिळवू शकतो.

The Digital Emprovement Foundation (DEP) दिल्ली आणि वोडाफोन या नामांकित कंपन्याची माहिती आणि संभाषण तंत्रज्ञान ओळखण्यासाठी व विकसित करण्यासाठी पुरस्कार आयोजित केलेले आहेत. मोबाईल तज्ञ डॉ. पिटर ब्रुक, M Billionth, Tom Ahomen, Jonathan Bill, Lonara, Tiakingto, Amitabh singhal Osama, Monzor, Dr Khan हे या पुस्काराचे प्रमुख सल्लागार आहेत.

वोडाफोन मोबाईल फॉर गुड अॅवार्ड 2012 Mobile Apps for the blind. Bidirectional Access Promation Society (BAPS) ने असं ॲप्लिकेशन विकसित केले आहे. जे कंपनी प्रणालीवर आधारीत आहे. त्याला पॉकेट, एस.एम.एस. ॲप्लिकेशन असे संबोधले जाते की, ज्याच्याद्वारे संदेशाच्या मोर्स कोडनुसार मोबाईल व्हायब्रेट होतो आणि अंध व्यक्ती सहज आणि नंतर युजर नेस्टचर (Gestrue) वर आधारित लेखनाद्वारे प्रतिसाद देऊ शकतो. हे ॲप्लिकेशन ॲरॉईड (Android) स्मार्टफोनमध्ये वापरले जाते. आता तज्ज्ञ असे ॲप्लिकेशन तयार करत आहे की ज्याच्या द्वारे अंध व्यक्ती विकिपिडीया आणि सोशल नेटवर्क वापरु शकतात.

Live Lihood 300 हे एक EPR आहे. ज्याच्याद्वारे शेतकरी कॉफीचे उत्पादन घेऊ शकतो. हे मोबाईल ॲप्लिकेशन फक्त J2ME तंत्रज्ञानावर चालते. आणि हारवेस्ट पिकांची खरी संख्या प्रणालीची माहिती आर्थिक व्यवहार अशा कागदपत्राला खरी संख्या एन्ड टु एन्ड हातभार लावते.

**– पवार प्रियंका (एफ.वाय.बी.एस्सी.)**

# मातृभाषा मराठी.....

महाराष्ट्र ही संत, महंत, राजे यांची भूमि समजली जाते. इसविसनच्या आठव्या शतकात जन्मलेल्या मराठीस दिवे आगारच्या ताम्रलेखावरुन अकराव्या शतकाच्या पूर्वार्धात चांगलेच पृथक स्वरुप प्राप्त झाले होते आणि तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्ञानेश्वरीच्या रुपाने तिला अलौकिक सामर्थ प्राप्त झाले.

१ मे १९६० रोजी भाषावार प्रांतरचनेनुसार महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व मराठीला महाराष्ट्र राज्याची राष्ट्रभाषा म्हणून दर्जा मिळाला. तो अजूनही टिकून आहे. माणूस या पृथ्वीवर जन्माला येतो ते आपण समाजाचे एक घटक म्हणून व वेगवेगळे ऋण घेऊनच. या पैकी न फेडता येणारे ऋण म्हणजे मातृभाषेचे ऋण. अशी कल्पना करा की माणसाला भाषाच अवगत नसती तर त्याने काय केले असते ? बाळाने आईजवळ हट्ट कसा काय व्यक्त केला असता ? आपल्या भावना, वेदना कशा काय आणि कोणाजवळ व्यक्त केल्या असत्या ?

व्यक्तिच्या जीवनात मातेचे व मायभूमिचे जेवढे महत्त्व असते तेवढेच मातृभाषेचेही असते. कारण मातृभाषा त्याच्यावर सुयोग्य संस्कार करीत असते. या संस्कारातून त्याचे व्यक्तिमत्व विकसीत होते, फुलते, संपन्न होते. ज्ञानदेवांनी मातृभाषेचे हे सामर्थ्य जाणले होते, म्हणुनच त्यांनी जनसामान्यांसाठी भगवद्गीतेतील तत्वज्ञान मराठीतून सांगण्याचा संकल्प सोडला नाही. नाथांनी मातृभाषेची ही थोरवी कळली होती म्हणून तर त्यांनी समाजाचा विरोध सहन करुनही मातृभाषेतच काव्यरचना करण्याचा आग्रह धरला. मातृभाषेतून आपले विचार रोकठोकपणे व विलक्षण तळमळीने व्यक्त करुन तुकाराम महाराजांनी अभंगरचना केली. शिवाजी महाराज हे महाराष्ट्र राज्याचे एक राजे होते. त्यांनी महाराष्ट्र राज्याची सुरक्षा व अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी आपले सैन्यदल उभारले व त्याला मराठा सैन्य असे नाव दिले.

आपल्या राष्ट्रात अनेक भाषा प्रचलित आहेत. तरी आपल्या मातृभाषेत बरीच गंमत आहे कि, मराठी भाषिक विद्यार्थी देखील दुर्लक्ष करतात. म्हणजेच पालक देखील काय मराठीचा काय वेगळा अभ्यास करण्याची गरज आहे ? एकदा वाचलं की पुष्कळ झालं असं सांगून पाल्यांना मराठी व्यतिरीक्त इतर विषयांच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यायला सांगतात. याचा परिणाम विपरीत होतो. 'अन्य विषयात होऊन जातो वर्ग सारा पास । पण मराठीचा पोरगा मराठीत नापास.' प्रामुख्याने दहावीच्या निकालाकडे नजर टाकली तर असे लक्षात येईल की, मराठीत नापास होणाऱ्या मुलांची संख्या अधिक आढळते. याचे कारण म्हणजे समाजाने मातृभाषेकडे केलेले दुर्लक्ष

आता मराठी माध्यमांच्या शाळांपेक्षा इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या वाढत आहे. आज दैनंदिन वापरात येणारे इतर भाषिक शब्द की ज्याचे आपणास मराठी अर्थ देखील माहिती नाही. आपली मातृभाषा मराठी ही जशी वळवावी तशी वळते व जशी समजून घ्यावी तशी समजते. मराठी भाषा ही सर्वगुण संपन्न आहे. तिला इतर भाषेतील शब्दांची ठिगळे जोडण्याची काहीही आवश्यकता नाही. केवळ भाषेवर आतोनात प्रेम असल्यामुळे पूर्व पाकिस्तानचा बांग्लादेश झाला. आपण देखील सर्वार्थाने मराठी भाषेवर प्रेम व निष्ठा व्यक्त केली तरच आपला मराठी बाना सिद्ध होऊ शकतो.

मुळातच असा प्रश्न निर्माण होतो कि, '' आम्हाला मातृभाषेचा अभिमान आहे का ?'' आपल्या देशाचा आणि आपला स्वतःचा व्यक्तिगत विकास आपणास साधायचा असेल तर आपल्या भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे व या मातृभाषेतील थोर ठेवा जतन केला पाहिजे, मराठी नष्ट होणार नाही याकडे लक्ष दिले पाहिजे.

**– पाखरे शितल अनिल (एफ.वाय.बी.ए.)**

# व्यसन मोबाईलचे....

शिर्षक वाचून तुमच्या मनात वेगवेगळ्या कल्पना आल्या असतील पण मी बोलतोय तुमच्याबद्दल...... हो हो तुमच्या बद्दल. तुम्ही इंजिनिअर असो कि, चहावाले, प्रोफेसर असो की विद्यार्थी, तुम्ही पुणे, मुंबई, नाशिकचे असो की अहमदनगरचे......

ग्रॅज्युएशन पूर्ण व्हायच्या आत मुलांच्या आणि मुलींच्याही हातात एक-दोन नव्हे तर चार-चार मोबाईल खेळत आहेत आणि ते ही या महागाईच्या जमान्यात. पेट्रोलचे भाव वाढल्यावर ओरडणारे आपण मोबाईल घेतांना तो विचार करत नाही. सातवीला असतांना सरांच्या मोबाईलची रिंगटोन ऐकणारा मी आज अनेक तासंतास मोबाईलमध्ये असतो आणि हो तुम्हीही असतात की.....

कोण आहेत हे सर्व मोबाईल वापरणारे तरुण ? मुंबई, दिल्ली सारख्या अल्ट्रामॉडर्न वातावरणात राहणारे सोकॉल्ट मॉडर्न तरुण ? अजिबात नाही. हे सारे लहान मोठ्या शहरात आणि खेड्यातही राहतात. जिथे २४ तास विज पोहोचली नाही म्हणून मोबाईल पोहोचलेच नाहीत असे थोडकेच आहे. म्हशीच्या मागे जाणाऱ्या भावड्याकडेही मोबाईल असतोच. पण ही गोष्ट इथंच संपत नाही तर ती इथेच सुरु होते. ती वाचण्यापूर्वी विचारा स्वत:ला सध्या तुम्ही जो मोबाईल वापरता तो तुमचा कितवा हॅण्डसेट आहे ? पहिला ? शक्यच नाही. दुसरा ? अजिबात नाही किमान तिसरा किंवा चौथा मोबाईल असेल तुमचा. तरीही तुम्ही मागेच आहात. कारण काहीसा ढोबळमानाने सर्व्हे केला तर असे दिसते कि, १६ ते ३० या वयोगटातील तरुणांमध्ये हॅण्डसेट बदलण्याचे प्रमाण मोठे आहे. पण मोठे म्हणजे किती तर कुणाचा १७ वा तर कुणाचा २० वा, कुणाचा ११ वा हॅण्डसेट असतो. ५ हॅण्डसेट बदलणारे ५०% वरंच.... का ? ही मुले शर्ट बदलावा इतक्या सहज मोबाईल बदलतात. त्यासाठी कुठुन पैसे आणतात ? मोबाईल म्हणजे नेमके काय शोधतात ही मुलं ? या प्रश्नाचं उत्तर त्यांच्याकडेपण नसते. पण एक गोष्ट लक्षात येते की एरवी मुलांची बरोबरी करणाऱ्या मुली सुद्धा या मोबाईल मोहिमेत मागे नाहीत. त्यांच्यामध्ये पण मोबाईलची क्रेझ आहे. चांगल्या फिचरचा मोबाईल वाट्याला येणाऱ्या मुलींची संख्या जास्त होत चालली आहे. मित्र किंवा मैत्रीनींच्या मोबाईलपेक्षा चांगला मोबाईल त्यांना हवा असतो. मग जुन्या मोबाईलचं काय ? विचारलं तर उत्तर मिळतं दिला घरच्यांना वापरायला. कुणी सांगतो विकला चार-पाचशेला, तर कुणी सांगतो पडलाय घरात कुणी फुकटपण घेत नाही.

अहो एकीकडे अर्धवट शिक्षण, कमाई शून्य तरीही येतोच नवा मोबाईल. आज स्मार्ट मोबाईल हा स्टेटस सिम्बॉल झालाय. अजब चित्र महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये दिसायला लागला. खरं सांगायचं झालं तर कधी स्वत: कष्ट करुन, कधी साचवून, कधी उसणवारी करुन आणि कधी तर घरच्यांशी भांडून सतावून घेतले जातात... मग मिळतो मोबाईल.

मोबाईल आला म्हणजे सिमकार्ड आणि स्मृतीकार्ड ( मेमरीकार्ड) घेतलं जातं आणि मग त्यात पाच-पन्नास एस.एम.एस, हॅलो ट्युन्स, फेसबुक, क्रिकेट स्कोअर, नाईट फ्री कॉलिंग सगळं पटापट ॲक्टिव्हेट होतं. मग छान छान गाणी, माझ्यापेक्षा कुणाचेच चांगले नको. आणि मी येता

जाता सर्वांना ऐकवणार असा ॲटिट्युड. मोबाईलमध्ये गाणे, व्हिडीओ तसेच कुणाचेही फोटो काढण्यापर्यंत खूप काही या छोट्याश्या डब्यात चालतं. इतकंच नव्हे तर इंटरनेर म्हटलं की मग तर काय सोशल मिडीया, व्हॉटसॲप, फेसबुक आणि मग माझा हा फोटो अपलोड करायचा, त्या फोटोला ५०० लाईक २०० कमेंटस् या सर्वांची क्रेझ, सर्वांशी गप्पा मारणे (चॅटींग) अनोळखी व्यक्तीशी ओळख करण. काही मुले मोबाईचा वापर इंटरनेटवरुन माहिती मिळविण्यासाठी करतात. काही नविन गोष्टी शिकतात. काही लेक्चरचे टाईमटेबल प्रोग्राम मध्ये सेट करतात. हे सगळं एका कंपासच्या आकाराच्या डब्यात चालू असतं. तरी महत्त्वाचा प्रश्न उरतोच. एक हॅण्डसेट जास्तीत जास्त किती वर्ष वापराल ? चार-पाच महिने - सॉलीड कॉम्प्रमाईज !

मोबाईल इंटनेट याचा शोध नेमका कोणी लावला, ही साधनं नक्की कशी संदेशवहन करतात ? या थेअरीत कोणालाच इंटरेस्ट नाही. ब्लु-टुथ तंत्रज्ञान नेमके काय आहे हे २०-२५ हॅण्डसेट बदलणाऱ्या कुणालाच ठाऊक नाही.

असे काही अपवाद वगळता म्युझिक, मस्ती, गप्पा, गाणी, फोटो, व्हिडीओ, फेसबुक याचसाठीच मोबाईल वापरले जातात. काही लोकांच्या म्हणण्यानुसार मोबाईलमध्ये डोकं घालतेल्या माणसाशेजारी बसणं म्हणजे एखाद्या मृत व्यक्तीला राखण बसल्यासारखं आहे. बऱ्याचश्या म्हणजे आपल्या सारख्यांना या मोबाईलचं एक प्रकारे व्यसन लागलेलं आहे. मोबाईल नसला की बरेच कामे अडकुन पडतात. याचे सद्‌उपयोग पण आहे आणि दुरुपयोग ही आहे. मग यातून आपल्याला काय निवडायचं ते आपल्या हातात असतं. मोबाईलमुळे बऱ्याचश्या अश्या गोष्टी आपल्या



वातावरणात तणाव निर्माण करतात.

म्हणुनच माझं एक म्हणनं आहे की , या सोशल मिडीयाचा सोसंल तितकाच उपयोग करा.......

**- इम्रान महेबुब शेख**
**(एफ.वाय.बी.एस्सी.)**

## ***Facebook***

काकांच, मामांच, मित्रांच, दादांच,
साऱ्यांच्या आवडीचं, एकच बुक......Facebook

आईच्या थोरवीचं, बाबांच्या अभिमानाचं
अनेकविध पानांचं एकच बुक ......Facebook

प्रेमाच्या गोष्टीचं, विरहाच्या स्टोरीचं
जेवढं पोरांचं तेवढेच पोरींचं
एकच बुक ......Facebook

**- बनसोडे शोभा सुधाकर**
**(एस.वाय.बी.एस्सी.)**

# काय गंमत असते शाळेची...

काय भूर्रकन गेले ते दिवस !
शाळेचे ! कळलंसुद्धा नाही !
शाळा संपल्यावर कळते काय गंमत असते शाळेची,
ती नशा, ती मस्ती,
कधी मित्रांशी कट्टी तर कधी दोस्ती,
शाळेतला दंगा, घेतलेला पंगा,
शिक्षकांनी दिलेली शिक्षा,
अरे देवा ! कठीण वाटे ती परीक्षा.
शाळा संपल्यावर कळते काय गंमत असते शाळेची,

आज मेंदूला ताण देत वर्गातल्यांची नावे आठवावी लागतात. कोण कुठे बसायचं, कसं शिकवायचं हे इतरांकडून विचारुन खात्री करुन घ्यावी लागते.

एकमात्र नक्की भूतकाळात रमतांना शाळेच्या आठवणीसारखे दुसरे काहीच नाही. क्वचित बदललेली शाळा, वर्गातील बदललेले बेंच, बदललले शिक्षक, नवे मित्र ! काही जुनेच मागून आलेले, काही मध्येच शाळासोडून गेलेले ! शाळेची नवी-जूनी इमारत, शाळेचे मैदान ! असा फार मोठा आणि चूंबकाला चिकटलेला विविध लोखंडाच्या वस्तूप्रमाणे झालेला असतो. शाळेत तयार करुन मागितलेले तक्ते ! शाळेत वर्ग सजवतांना पताकांसोबत घातलेला धिंगाना ! सर्वांच्या सोबत खाल्लेला मार ! शाळेची सहल ! टिंगळ टवाळी, अखंड बडबड, मॉनिटरने वहीत नाव लिहून घेणे, मग सरांपर्यंत पोहोचू नये म्हणुन धडपडलेले आपण ! असे अनेक चाळे आपण शाळेमध्ये केलेले असतात. म्हणूनत भूतकाळात रमत असतांना वाटते काय गंमत असते शाळेची ?

जीवावर आलेल्या त्या घटक चाचण्या, सहामाही आणि त्याहून मनाला टोचणारे ते वर्गात पेपर देऊन सरांचे मार्क सांगण्याचे प्रसंग. कधी शाळेत आलेले जादूचे प्रयोग, कागदाची ओरोगामी शिकविणारे कलाकार, त्यांची पुस्तके घेऊन शिकण्याचे प्रयत्न करतांना फसल्याची जाणीव होणारे आपण. नळावर पाणी प्यायला जणु गोठ्यातून सोडून दिलेली तहानलेली वासरं गायांचे दुध प्यायला धावतात तसे धावणारे आपण. काय सुंदर दिसतं हे आठवणीतून ! धावत्या चित्रांचा पटच जणू कुणी समोर धरुन दाखवत आहे. खरंच शाळेतील गोष्टी आठवल्यावर वाटतं काय गंमत असते शाळेची. शाळेची दिवस आठवल्यावर आठवते एक कविता....

अजून ही शाळेतल्या 'त्या आपल्या'
बेंचवर जाऊन बसावं वाटतंय,
शाळेतल्या प्रत्येक मास्तर, बाई,मामा
सगळ्यांना परत भेटावसं वाटतंय,
परत सगळ्या मित्रांना भेटून
प्लास्टिकचा बॉल आणि लिहायच्या
पॅडची बॅट घेऊन क्रिकेट खेळावं वाटतंय

शाळेतील पेपर आल्यावर आपण अभ्यासाठी किती धडपड करतो ? जो हुशार मुलगा आहे त्याला जास्त धडपड करण्याची गरज पडत नाही. मला वाटतं माझ्या सारख्यांना पेपर जवळ आल्यावर खूप धडपड करावी लागत असणार. शाळेतील पेपर चालू असतांना ''कोप्या'' हा चांगल्या नावाचा प्रकार असतो. मुलांमध्ये 'कोप्या' एकमेकांना पास करण्यासाठी जो-तो मनापासून गर्ग असतो. शाळेतील 'कोप्या' नावाच्या प्रकारावरुन मला एक ओळ सुचते

शैक्षणिक व्यापाऱ्यांपासून पालकांपर्यंत,
तन मन धनाचे योगदान असते,
आंधळ्या मायेपोटी,
कुठे कुणाला कशाचे भान असते ?

**- कदम बापू जवाहरी (एफ.वाय.बी.एस्सी.)**

# जीवन जगण्याची कला...

**जीवन तणामुक्त व आनंदी जगण्यासाठी तसेच दु:ख व चिंता कमी करण्याचे मार्ग –**

१) कोणत्याही गोष्टीची अपेक्षा करु नये. अपेक्षा केल्याने अपेक्षाभंग झाल्यास दु:ख होते व अपेक्षा पूर्ण झाली की मिळणारा आनंद मर्यादिती असतो. त्यापेक्षा अपेक्षा न करता यश मिळाले तर मिळणारा आनंद निर्भेळ असतो. अर्थात श्रीकृष्णाने अर्जुनाला हेच सांगितले आहे **''कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन''** फळाची अपेक्षा न करता कर्म करीत रहा.

२) माझे शरीर हे मला परमेश्वराने दिलेली अनमोल देणगी आहे. हे शरीर जपले पाहिजे.

३) मी कोण आहे ? मी म्हणजे शरीर नव्हे. परमात्म्याचा अंश मी आहे. स्वत:बद्दल कमीपणाची भावना ठेवू नये. परमेश्वराचे अंश म्हणुन आपले आचार व विचार हे श्रेष्ठ दर्जाचे असावेत.

४) श्वास, अन्न व विश्रांती (झोप) हे आपल्या उर्जेचे स्त्रोत आहेत. म्हणून उर्जेच्या या तिनही स्त्रोतांचा जाणीवपूर्वक व पुरेपूर उपयोग करुन घेतला पाहिजे.

**श्वास :** प्रत्येक श्वास खोल व दिर्घ घेण्याची सवय लावावी, त्यामुळे ऑक्सिजनचा मुबलक पुरवठा होऊन शुद्ध रक्ताचा संचार संपूर्ण शरीरभर होतो. त्यामुळे आपली कार्यक्षमता वाढते व आरोग्य प्राप्त होते.

**अन्न :** अन्न उर्जा निर्माण करते. अन्न हे पूर्णब्रह्म आहे. निसर्गातील अनेक घटकांकडून घेतलेली शक्ती अन्नात असते. म्हणून अन्न खातांना त्याची चव, त्याचा रंग याकडे पूर्ण लक्ष देऊन ते समरसून खावे.

**विश्रांती :** झोप घेतल्यानंतर आपण ताजे तवाने होतो. म्हणजेच आपल्याला झोपेतून उर्जा मिळते म्हणून झोप तणावमुक्त, वेळच्या वेळी, गाढ व पुरेशी मिळावी.

५) मन तणावमुक्त व चिंतामुक्त करण्यासाठी भूतकाळातील कटू प्रसंग, दु:खद प्रसंग यांचे विचार मनातून प्रयत्नपूर्वक काढून टाकावेत, असे विचार मनातून प्रयत्नपूर्वक काढून टाकावेत, असे विचार मनात आल्यास आपले लक्ष इतरत्र द्यावे. भविष्यकालीन काल्पनिक विचारही मनात येवू देवू नये. भूत व भविष्यातील काल्पनिक व दु:खद असतात. म्हणून वर्तमानकाळातील प्रत्येक क्षणातून पुरेपूर आनंद घेण्याचा प्रयत्न करावा.

६) आपल्या दु:खाला फक्त आपणच कारणीभूत असतो. आपल्या मनातील ताणतणावाला आपणच जबाबदार असतो. दुसऱ्याने आपल्याला दिलेल्या शिव्या, ठेवलेली नावे यांचा आपण सातत्याने विचार करतो व त्यामुळे आपले मन दु:खी होते. दुसऱ्याच्या वागण्यावर आपण आपले मन स्वास्थ अवलंबून ठेवतो. म्हणून जग काय म्हणते किंवा जग काय म्हणेल याचा मुळीच विचार करु नये. आपल्याला जे योग्य वाटते त्याप्रमाणे वागत रहावे. दुसऱ्यांच्या शिव्यांचा स्विकारच करु नये. त्या आपल्याकडे येणारच नाहीत. जो देतो त्याच्याजवळच राहतील व त्यापासून आपल्याला दु:ख होणार नाही.

७) आपल्या सानिध्यात असणाऱ्या व्यक्तींचा त्या जशा आहेत तशा स्थितीत स्वीकार करावे. त्यांचे अवगुण, त्यांचे दोष या बाबी आपण कदापीही सुधारु शकणार नाहीत. त्यांच्या दोषांचा व अवगुणांचा विचार करुन आपण दु:खी होतो. म्हणून त्यांच्या अवगुणांचा विचार न करता त्या जशा आहेत तशाच स्विकारावेत म्हणजे त्यांच्याशी समायोजन करावे.

८) प्रतिकूल परिस्थिती, संकटे अडचणी अशा प्रसंगी चिडचिड करणे, कुरकुर करणे यामुळे जीवनातील दु:ख आणखी वाढते. त्यामुळे अडचण सोडविण्याचा मार्गही सुचत नाही. त्यापेक्षा अशा प्रसंगी मन शांत ठेवल्यास दु:ख कमी होते व अडचण सोडविण्याचा मार्ग ही सुचतो.

९) कोणतेही काम पार पाडण्याची जबाबदारी आपण आनंदाने स्विकारावी, जबाबदारी स्विकारल्यामुळे आपली मानसिक व शारीरीक शक्ती वाढते व समाजात आपली किंमतही वाढते. या उलट जबाबदारी टाळण्याच्या सवयीने आपली शक्ती व किंमत दोन्हीही कमी होतात व आपण यामुळे दु:खी बनतो. म्हणून आनंद जीवनासाठी सतत नव्या नव्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्यात.

१०) मन:शांती मिळविण्यासाठी दिवसभरातून किमान एक तरी चांगले काम करावे.

११) आपले आचरण शुद्ध व चरित्र स्वच्छ ठेवावे.

१२) आपला प्रिय परमेश्वर, पुज्य गुरु व माता पिता यांना रोज वंदन करावे.

१३) क्रोधामुळे मनस्वास्थ्य बिघडते शारीरिक व मानसिक शक्ती कमी होते. म्हणून क्रोधाचे प्रसंग प्रयत्नपूर्वक टाळावेत.

१४) शत्रुत्व मनस्वास्थ्य बिघडविण्यास आणि आपल्या व आपल्या कुटुंबाच्या विनाशास कारणीभूत ठरते. म्हणून आपल्या सानिध्यातील व संबंधातील सर्वच व्यक्तींशी प्रेमाने वागावे. त्यांच्याशी हंस्तालोंदन करणे, स्मित करणे, त्यांच्या सुखदु:खात सहभागी होणे, त्यांच्याबरोबर चहापान करणे या पैकी जे जमेल ते करीत रहावे. त्यामुळे जीवन तणामुक्त व आनंदी राहते.

**– प्रा. वाबळे सुप्रिया सुनिल**
**(कॉम्प्युटर सायन्स)**

## तुझे माझे नाते.....

म्हणुनच हृदय फक्त तुझे गीत गाते
एकांतपणी ही माझ्या साथ तु येते
कळत नकळत गीत तयार होते
योगा योग म्हण नाही तर अंधश्रध्दा
पण लाखोच्या दुनियेत मन तुझेच का होते ?
आधीच ठरवले होते तुझे माझे नाते

म्हणुन हृदय फक्त गीत गाते
टाळतो मी, जाळतो मी, तरी ही
स्वप्नात ही तुझाच वावर
झोपेतही नाव तुझेच येते
आधीच ठरले होते तुझे माझे नाते

म्हणुनच हृदय फक्त तुझेच गीत गाते
नाही कळत जगाला जगापलिकडे हे जाते
''कृष्ण, कृष्ण'' करत मीरा विष ही पिते
ठरविले होते आधीच त्याने म्हणुन हे होते
मान न मान तु पण मन तुझेच गीत गाते
आधीच ठरले होते तुझे माझे नाते
म्हणुनच हृदय फक्त तुझे गीत गाते

**– रवि जाधव (टि.वाय.बी.ए.)**

## विनोद.....

वडील : बाळा तू आकाशातील तारे मोजू शकतोस का ?
मुलगा : हो बाबा,
पण आता खूप रात्र आहे
सकाळी उजेडात मोजीन.......

# नातं..... आजी आजोबांचं....

नातं....काय बरं पहिला विचार मनात येतो. मनात हा शब्द पाहिल्यावर खरं तर शब्दाला अर्थच देता येत नाही. नातं हे अनेक असतात. आई–वडिल, भाऊ–बहिण, मित्र–मैत्रिण यांचे नाते. आता हा शब्द 'नातं' उच्चारुन बघा. एकदा त्यातला 'तं' हे न थांबणारं आहे. अगदी अखंड वाहणाऱ्या निर्मळ झऱ्यासारखा वाहणारा सुंदर असला पाहिजे. नात्यांमध्ये सगळ्यात आवडलेलं आणि भावलेलं नातं माहितीये कुठले ते ? तर ते आहे आजोब–आजीचे नात–नातू किंवा आजी–नात–नातू होय.

'' आवडतात भारी मला माझे आजोबा
पाय त्यांचे थकलेले, गुडघ्यांत वाकलेले,
केसही सारे पिकलेले
ओठांवर गीता गाती माझे आजोबा
नातंडा बोलावून घोगऱ्याश्या आवाजानं
सांगती गं रामायण
मोबदला घेती पापा माझे आजोबा
रोगजता बाबा–आई
आजोबांचा माया देई
जवळी ते घेती बाई
माझे आजोबा ''

असं आहे अजोबांचे वर्णन आजोंबांप्रमाणे आजीलाही तेवढाच मान सन्मान आहे. छोट्या मुलांना आई–बाबा रागावले की ते लगेचच आजोबा– आजीकडे जातात व सांगतात मला मारले. त्यावर आजोबा प्रेमाने जवळ घेवून एक खाऊची वडी देऊन आपलंसं करतात. पाहण्यात असंही आलेलं आहे की आधी जरा कडक आणि थोडसे खवचट असणारा माणूस नातू / नात आले की एकदम कापसासारखं मऊ होतात. पण आजी



आजोबा आणि नातू असलेली घरे खरेचच गोकुळासमान भासतात.

**– साळवे दिपाली दत्ता**
**(टी.वाय.बी.ए.)**

# नाते मैत्रीचे...

*डोळातून वाहणारं*
*पाणी कोणीतरी*
*पाहणारं असावं.....*
*ह्दयातून येणारं दुःख*
*कोणीतरी जाणणारं असावं....*
*मनातून येणाऱ्या आठवणी*
*कोणीतरी समजावणारं असावं....*
*जीवनात सुख दुःखात*
*साथ देणारं एक सुंदर*
*नातं असावं*

*साळवे दिपाली दत्ता*
*(टी.वाय.बी.ए.)*

# गुरुशिष्याचे अनोखे नाते...

''गुरुब्रह्मा गुरुविष्णू गुरुदेवो महेश्वरा''
''गुरु साक्षात परब्रह्म तस्मे श्री गुरुवेनम: ''

भारतीय संस्कृती जगभरात महत्वाची मानली जाते. कारण भारतीय संस्कृतीने जगाला अध्यात्मिक शिक्षण, अवकाश शास्त्र, संस्कार अशा अनेक मौल्यवान गोष्टींची ओळख प्रदान केली आहे. शिक्षण हे समाजाभिमूख असावे असा संदर्भ भारतीय महाकाव्यामध्ये आलेला आहे. त्याचबरोबर गुरु आणि शिष्य यांचा संबंध कसा असावा याचे विश्लेषण करुन सांगितले आहे. महाराष्ट्र राज्याने भारतीय संस्कृतीचा वारसा अधिक कल्पकतेने आणि प्रभावीपणे मांडला आहे. आपल्या राज्यामध्ये माऊली ज्ञानेश्वर आणि त्यांचे गुरु निवृत्तीनाथ यांचे गुरु शिष्याचे संबंध आपण सर्वजण जाणतो आहोत. गुरु आणि शिष्य या नाण्याच्या दोन बाजू असून त्यातील कोणतीही बाजू खोटी ठरली तर ते ध्ये साध्य होत नाही.

माझे गुरु : माझे विश्व

लहान होतो तेव्हापासून तुम्ही आम्हाला शिकवंलं
आमच्या अंगी असणारे अज्ञान सारं काही मिटवलं
कसं वागावं, कसं जगावं हे शिकवलंत तुम्ही
याच तुमच्या मुलमंत्रावर जग जिंकु आम्ही
तुमची प्रत्येक शिकवणच या जगासाठी आधार आहे
हा ज्ञानाचा वारसा आम्ही आयुष्यभर जपत राहू
वयाने मोठे झालो तरी तुमच्यासाठी विद्यार्थीच राहू
कायम तुमच्या चरणावर कृतज्ञतेचे फुलेच वाहू

'' ज्याप्रमाणे कुंभार हा चिखलाच्या गोळ्याला आकार देऊन मडके घडवितो. त्याचप्रमाणे शिक्षक हे विद्यार्थ्यांना योग्य ज्ञान देऊन घडविण्याचे काम करत असतात.



अशा गुरुंना माझे शतश: प्रणाम......

**– कु. सोनाली दत्तात्रय साळवे**
**(एफ्.वाय.बी.ए.)**

## आईपण.....

आईपण जपण्यासाठी आयुष्यभर झिजलीस तू
निशब्द राहूनही प्रत्येक वेळी
किती किती बोललीस तू ,
सरणावर जळतात एकदाच शेवटी
पण रोज जळत राहिलीस तू
प्रत्येक घास आम्हाला चारतांना
किती तरी व्यापलीस तू
थकलीस कितीदा पण
चालतांना थांबली नाहीस कधी तू
तुझं आईपण आम्हाला देतांना
काहीच नाही राखलं तू
थोर तुझे आईपण आई
आभाळ पेलणारी पृथ्वी तू.....

– हरिओम सुभाष नागरे (एफ.वाय.बी.एस्सी.)

# आता फेसबुक टीनएजर्ससाठी...

'' फेसबुक '' हे सोशल साईटमधील सगळ्यात लोकप्रिय असल्याचे सिद्ध झाले आहे. तसेच या साईटवर कॉलेजियन्स पासून ते अगदी वडील–आजोबांपर्यंतचे वय असणाऱ्या लोकांचे अकाऊंट आहे. पण आता टिनएजर्स मुला–मुलींना फेसबुकचे विश्व आता अधिक खुले झाले आहे.

नेटवर्किंग वेबसाईटमध्ये आघाडीवर असलेल्या फेसबुकने टीनएजर्सना आपले पोस्ट आणि फोटो सर्वांबरोबर शेअर करण्याची मुभा दिली आहे. फेसबुकवर आतापर्यंत १३ ते २७ वयोगटातील मुलांना त्यांच्या वयोगटातील ग्रुप अथवा मित्रांसोबत पोस्ट आणि फोटो शेअर करता येत होते, मात्र फेसबुकने ही मर्यादा काढून टाकली. यामुळे टीनएजर्सचे फेसबुक विश्व अधिक खुले झाले आहे. फेसबुकने केलेल्या या बदलामुळे आता मुलांना पोस्ट आणि फोटो सर्वांसोबत शेअर करता येतील.

सध्या फेसबुकवर १३ वर्षाखालील मुलांना अकाऊंट ओपन करता येत नाही. मात्र फेसबुकवर अकाऊंट ओपन करतांना संबंधित व्यक्तीचे वय तपासण्याची कोणतीच यंत्रणा उपलब्ध नाही. विशेष म्हणजे फेसबुकने अद्याप आपल्या युझर्सपैकी कितीजण टीनएजर्स आहेत, हे उघड केलेले नाही. अर्थात, फेसबुकने केलेल्या या बदलामुळे टीनएजर्सच्या इंटरनेट वापरण्यासंदर्भात भिती व्यक्त केली जात आहे.

**– भिंगारदिवे पायल बाबासाहेब**
**(एफ्.वाय.बी.एस्सी.)**

# मनाचा भाव.....

जीवाशी जडता जीव
मनाशी मनाचा भाव
सुखाचा गवसे गाव
मैत्र तयाचे नाव

रंगांची, रेषांची भाषा
भुईची हिरवी आशा
कवळाव्या दाही दिशा
मैत्रीच्या तऱ्हा या अशा

तानपुऱ्याच्या झंकार
शब्दस्वरांच्या ओंकार
वेणूत प्राणफुंकार
मैत्रीचा तेथे हुंकार

पक्षाची निळुली शीळ
नक्षत्ररत्न आभाळ
हिवाळी उन्हे मावाळ
मैत्र जुळले लडिवाळ

ऐक्य हे चराचराचे
सख्य हे जिवाशिवाचे
जुळणाऱ्या स्वभावाचे
नाव स्नेहाच्या गावाचे

मैत्री करुणेशी जुळो
शांती क्षमा त्यात कळो
अंतराची तार जुळो
माणूस हा माणसा मिळो...

संकेत काळे (टी.वाय.बी.कॉम)

# माझं ग्रंथालय...

मला माझं लहानपण आठवलं की बरं वाटतं. मी शाळेत शिकत असतांना माझ्या शाळेत एक छोटंसं ग्रंथालय होतं. त्यामध्ये खुप चांगली पुस्तके होती.अनेक पुस्तकांमध्ये जीवन जगण्याची कला, मुल्ये, आदर्श,ध्येय, निष्ठा, प्रेम, जात, धर्म, देव अनेक घटना अभ्यासाला मिळाल्या. आज शिक्षण पूर्ण करुन असेच पुस्तके पुन्हा पहायला मिळतील आणि वाचायला मिळतील हा विचारच मी केला नव्हता. एक वेळ विद्यार्थी म्हणुन ग्रंथ वाचत होतो, आज स्वतःच 'ग्रंथपाल' म्हणून पुस्तक वाचतांना फार आनंद वाटतो.

माझं शाळेचे 'ग्रंथालय', माझ्या कॉलेजचं 'ग्रंथालय' यामध्ये अनेक कथा, कांदबऱ्या, नाटकं, एकांकिका, उपन्यास, निबंध, व्याकरण, शब्दकोश, अनुलेखन, जीवनचित्रण, विचारवंत, इतिहास कालीन ग्रंथ, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, भगवद्‌गीता, पर्यावरण व अनेक विषयांची पाठ्यपुस्तके अस्तित्वात आहेत. खरं सांगायचं तर पूर्वीपासूनच मला लिखाणाची फार आवड होती. ते लिखाण करण्यासाठी मला अनेक पुस्तकांचे वाचन करावे लागले. आपण ज्यावेळी आपले विचार कागदावर उतरवत असतो त्यावेळी अनेकवेळा जुन्या आठवणी येतात. शाळेत होतो तेव्हा मजा यायची. किती चांगलं होतं ते जीवन. कोणी कधीही बोलत नव्हतं, आपल्याकडून काही चुकलंकी सर्वजण आपलीच बाजू घेऊन बोलायचे, जाऊद्या लहान आहे तो. खरंच किती छान होतं ते जीवन. आता मोठे होता होता सर्व जबाबदारी येवून पडली आहे. नुसतंच काम करायचं. कधी कधी वाटतं, लहानपण चांगलं होतं !



माझं 'ग्रंथालय'म्हणुन काम करतांना खुप अनुभवही आले. माझं कॉलेज हे तसं छानच. मुलं शिक्षण घेतात. आनंद वाटतो तेव्हा; जेव्हा ही मुलं आपलं काम आणि आपली जबाबदारी पार पाडत असतात.

अनेकवेळा मी मुलांना ग्रंथालयात आल्यावर खुप रागावलो आहे. मलापण त्याचं वाईट वाटतं, आपल्याला जर कोणी बोललं तरी सहाजीकच आपल्याला वाईट वाटतं पण....... आजपर्यंत विद्यार्थी जे काही करतात ते चांगलं असावं असं मला वाटतं. माझ्याकडे मुले ग्रंथालयाचं काम करण्यासाठी येतात. सर तुम्ही आम्हाला खूप काम सांगता असे मुले मला सतत म्हणतात, पण हे काम आपलंच आहे, ते प्रामाणिकपणे पूर्ण करा असे मी त्यांना नेहमीच सांगतो.

मला ग्रंथालयातील पुस्तके फार आवडतात. त्यांना थोडीशीही इजा होता कामा नये असं मला वाटतं. पुस्तक फाटले की मला वाईट वाटतं, जीवनातील अनेक घटनाक्रम या पुस्तकात असतात. पुस्तक फाटले की त्याचे चांगले व्यवस्थापन झालेच पाहिजे ना ! ज्ञान मिळणं सोपं

नाही. ते मिळवावं लागतं. पुस्तक आपल्या विचारांना घडवत असतात. आपण उदाहरण दिले तर स्वामी विवेकानंद जी सतत पुस्तकांचे वाचन करत होते, अत्यंत ज्ञानी महापुरुष होते, पुस्तक आपले विचारक असतात ना !

ग्रंथालयातील पुस्तकांची मांडणी करतांना अनेकवेळा विषयानुसार पुस्तके पाहिजे म्हणुन अवांतर, संदर्भ,पाठ्यपुस्तके, नियतकालिके, सी.डी. यांची वेगवेगळ्या कप्प्यात मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांना चांगला वाचनकक्ष असावा, अवांतर स्पर्धा परीक्षेची पुस्तके खरेदी करण्यात येते. विद्यार्थ्यांची आवड–निवड यामध्ये विचारात घेण्यात येते. एक चांगला माणुस वा विचारक घडण्यासाठी माझं ग्रंथालय तयार आहे. अनेक वाचन साहित्य ग्रंथालयात उपलब्ध आहे. एक चांगला माणूस घडविण्यासाठी अनेक ग्रंथ आवश्यक आहेत. हे ज्ञान मंदिरच म्हणावे लागते. ज्यामध्ये आपल्याला हव्या असणाऱ्या सर्व माहितींचे ज्ञान आपणास ग्रंथालयात मिळते.

माझ्या ग्रंथालयात मी नेहमीच चांगली पुस्तके मी विद्यार्थ्यांना वाचावयास सांगतो. ग्रंथ हे आपले गुरुच म्हटले तर काही हरकत नाही. शेवटी आपण अनेक विचार ग्रंथातूनच वाचत असतो व ते आचरणातही आणतो. म्हणुनच सांगायचं एवढंच असतं की वाचन साहित्याचा चांगला अभ्यास आपणास एक चांगले वळण लावतो व जीवनास परिवर्तीत करतो.

**– प्रा. राऊत दत्तात्रय विलासराव**
**(ग्रंथपाल, एम.ए.बी.एड्.)**

# *Internet*

*Out Dated* **झालयं आयुष्य**
**स्वप्नही** *download* **होत नाही**
**संवेदनांना** *virus* **लागलाय**
**दुःख** *send* **करता येत नाही**
**जुने पावसाळे उडून गेलेत**
*delete* **झालेल्या** *file* **सारखे**
**अन् घर आता शांत असतं**
*Range* **नसलेल्या मोबाईल सारखे आणि**
*Hang* **झालेल्या** *PC* **सारखे**
**मातीची स्थिती वाईट**
**जाती माती जोडणारी**
**कुठेच नाही** *Website*
**एकविसाव्या शतकातली**
**पिढी भलतीच** *Cute*
*Contact list* **वाढत गेली**
**संवाद झाले** *mute*
*Computer* **च्या** *Clip* **सारखा**
**माणूस मनानं खुजा झालाय**
**अन्** *Mother* **नावाचा** *board*
**त्याच्या आयुष्यातून वजा झालाय**
*Floppy disk, drive* **मध्ये**
**आता संस्कारांनाच जागा नाही**
**अन् फाटली मन साधणारा**
*Internet* **वर धागा नाही**
**विज्ञानाच्या गुलामगिरीत**
**केवढी मोठी चूक**
**रक्ताच्या नात्यांनाही**
**आता लागते** *Whatsapp & Facebook*

***- Ankita Satish Kanojiya***
***F. Y. B.Sc.***

# सुनिता विल्यम्स...



'' यशाच्या शिखरावर घे उंच भरारी
जिथे थांब म्हणायला, शरमेल दुनिया सारी ''

सुनिताने आपला जीवनप्रवास सुरु केला तो पाया रुजवण्यापासुन कळसापर्यंत. सुनिता विल्यम्सचा जन्म १९ सप्टेंबर १९६५ साली ''युक्लिड ओटिओ '' या युनायटेड स्टेटस मध्ये झाला. सुनिताने आपले पदवीपर्यंतचे शिक्षण हे ''निदम हायस्कुल'' मध्ये केले. तिने पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले ते विज्ञान शाखेतून. फिजीक्स या विषयात करिअर केले. १९८३ मध्ये तिने '' बॅचलर ऑफ सायन्स '' ही पदवी घेतली.

''लहरों से डरकर नौका, पार नही होती.....
कोशिश करनेवालों की, हार नही होती !

या काव्यपंक्तिला साजेल अशीच सुनिता विल्यम्स ची कामगीरी आहे. सुनिता अंतराळवीर आहे. तीला भारतीय वंशाची म्हणतात. कारण तिच्या वडिलांचे नातेवाईक हे भारतीय वंशातील गुजरात राज्यात रहात होते.

'' परक्यांनाही आपलंसं करतील
असे गोड शब्द असतात......
शब्दांनाही कोडं पडावं अशी
काही गोड माणसं असतात ......
किती थोर भाग्य आपलं
जेव्ही ती आपल्या देशातील असतात....''

सर्वात जास्त अंतराळात प्रवास करणारी महिला म्हणजे सुनिता विल्यम्स होय. तिने सर्वात जास्त पराक्रम गाजविला तो सलग ४ महिने अंतराळात प्रवास करण्याचा. इंटरनॅशनल स्पेस स्टेशनमधे निवड करण्यात आली. एका पाठोपाठ ती आपल्या यशाच्या कळस उंच-उंच नेत होती. ज्याप्रमाणे महापुरुषांनी म्हटलं आहे कि,

'' उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी
नजरेत सदा नवी दिशा असावी
घरट्यांचे काय आहे
बंधनात येईल केव्हाही,
क्षितिजापलिकडे झेप
घेण्याची जिद्द असावी ''

या काव्यपक्तींप्रमाणे सुनिता आपली यशाची क्षितीज पार करत होती. त्यातच तिने **U.S.** पायलट स्कुलमध्ये प्रवेश घेतला. तिने यानाच्या सुरक्षेबद्दल आवश्यक असलेल्या गोष्टींची माहिती घेतली. आकाशात उडणारे यान **SH60, BLF,UH-1, AH-1W, SH-2, WH3, H-46, CH-53** आणि **H-57** या याना संदर्भात माहीती मिळविण्यास सुरुवात केली. त्याबरोबरच इंटरनॅशनल स्पेस स्टेशन (आय.एस.एस.) या ठिकाणी मानसशास्त्राचे प्रशिक्षण पूर्ण केले.

'' लक्षावधी वर्षांनी एखाद सूर्य
निर्माण होतो.
कित्येक कळप सापडल्यावर
कस्तुरीमृग सापडतो
हजारो शिंपले उघडल्यावर
एखादा मोती दिसतो''

खरोखर ज्याप्रमाणे म्हटले जाते हिरा

मातीत पडला तरी तो आपल्या गुणांमुळे चमकतो. त्याप्रमाणे सुनिता आपल्या कतृत्वाच्या बळावर नासा सारख्या उच्च संशोधन केंद्रात आपल्या नावाचा ठसा उमटवत होती.

'' स्वप्न जिथे साकार होते
जीवन तिथे आकार
कल्पनेतील स्वप्न सत्यात उतरते
तेव्हा जीवन खऱ्या अर्थाने
परिपूर्ण होते ''

एप्रिल २००७ मध्ये जानेवारीत ३१, फेब्रुवारी ४ आणि फेब्रुवारी ९ या तारखांना सुनिताने तीन स्पेसवॉक पूर्ण केले. इंटरनॅशनल स्पेस स्टेशनचे ते आयोजन केले होते.

'' जीवन हे फुलसारखे असावे,
पण ध्येय मात्र मधमाशी
सारखे असावे''

याच प्रमाणे सुनिता विल्यम्स चा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक स्त्रीने आयुष्यात यशस्वी व्हावे.

**– बनसोडे शोभा सुधाकर**
**(एस.वाय.बी.सी.ए.)**

## दिवस ...

दिवस असा एकही जात नाही
केलेल्या चुकांची जाणीव होत नाही,
काही केल्या ते विसरता येत नाही
किती सांगितले तरी वेडे मन मानत नाही.

नाही नाही म्हणता पुन्हा याच
चुका करते
आणि मग जाणिव होताच
एकांतात रडत बसते
म्हणूनच दिवस असा एकही
जात नाही
केलेल्या चुका सुधारतांना
नवीन चुकांची जाणीव होत नाही....

गव्हाणे कावेरी रविंद्र
(टि.वाय.बी.कॉम.)

## नशिब ...

जी माणसं हवीशी वाटतात,
ती कधीही मिळत नाही.
जी माणसं नकोशी वाटतात,
त्यांचा सहवास संपत नाही.
ज्यांच्याकडे जावेसे वाटते,
त्यांच्याकडे जायला जमत नाही.
त्यांच्याकडे जाऊ नये असे वाटते,
त्यांच्याकडे जावं लागते
जेव्हा जीवन नकोसं वाटतं,
तेव्हा काळ संपत नाही.
जेव्हा जीवनाच अर्थ कळतो
तेव्हा काळ संपलेला असतो.
नशीब हे असंच असतं
त्याच्याशी जपून वागावं लागतं
तिथे कुणाचं चालत नाही
जिकडे नेईल तिकडे जावे लागते.

गव्हाणे कावेरी रविंद्र (टि.वाय.बी.कॉम.)

# *Save the Girl Child....*



माँ चाहिये, पत्नी चाहिये, बहन चाहिये... फिर बेटी क्यूँ नही...

भारतीय संस्कृतीत महिलांना उच्च स्थान असतांना आज मात्र जन्माआधीच मुलींची हत्या केली जाते. या सारखी देशात कुठलीच दुर्दैवी गोष्ट नाही. महिलांचे प्रमाण असेच कमी होत राहिले तर देशात अनेक समस्या उभ्या राहणार आहेत.

आज आपण पाहतो सर्व क्षेत्रात स्त्री ही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून प्रगती करत आहेत ते क्षेत्र Technology, Business, Real Estate, Construction, Media, Food & Beverage, games, health & Medicines ह्या पैकी कुठलीही अशी सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. आपण सर्व नीता अंबानी, चंदा कोचर (सीईओ, आयसीआयसीआय बँक), अरणा जयंथी (कॅप्जेमीन सीईओ) ह्या व्यावसायिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांच्या प्रगतीबद्दल ऐकतच असतो. तसेच महाराष्ट्रातील स्त्रीयांसाठी बलिदान दिलेल्या सावित्रीबाई फुले ह्यांनी जर स्त्रीयांच्या शिक्षणाचा वसा उचचला नसता तर आपण इथपर्यंत पोहचलो नसतो. अंजली भागवत आणि तेजस्वीनी सावंत ह्यांनी रायफल शुटींग मध्ये नाव कमवून महाराष्ट्राचे नाव पुढे नेले आहे. तसेच सामाजिक कार्य करत असलेल्या आणि अनाथांची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांची महती आपण याची देही याची डोळा पाहतो आहे आणि ऐकतो पण आहोत. आज १०५० अनाथ मुलांचा संभाळ त्या त्यांच्या आश्रमात करतात.

ह्या अश्या निरनिराळ्या क्षेत्रात प्राविण्य असणाऱ्या स्त्रीया आपल्या गावात, शहरात, महाराष्ट्रात काय तर अवघ्या जगभरात नावलौकिक कमवत आहेत.

सरकारने जसे 'बेटी बचाओ' चा नारा दिला आहे तसाच 'बेटी पढाओ' चा नारा पण दिला आहे. आज मुलींनी शिकून स्वतःच्या पायावर उभे राहणे ही काळाची गरज आहे. नुसती डिग्री मिळावी म्हणून शिक्षण घेऊ नये. तर आयुष्यात काहीतरी बनून दाखवायचे म्हणून शिक्षण घ्या.

**– प्रा. दारुणकर प्रेरणा**
**बी.सी.ए.**

---

# नोट

**बरं झालं राजेचा फोटो**
**नोटांवर छापला नाही**
**कारण नोटा कुठं कुठं**
**उडवल्या जातात हे**
**फक्त गांधीजीच**
**सहन करु शकतात.**

**– फंड ज्योती आसाराम**
**(एफ.वाय. बी.ए.)**

# ढग भरल्या आभाळातून...



ढग भरल्या आभाळातुन
पाऊस पडो ना पडो
त्यांना ह्याचे काही घेणे देणे नसते
ह्यांच्या नळाला पाणी येतेय
तेवढेच त्यांना पुरे असते.....
शेतकऱ्याचे काय झाले....?
शेतमजुराचे काय झाले....?
कसा देशोधडीला लागलाय
ह्यांना न काही देणे घेणे असते
दुष्काळी कामासाठी
ह्यांची सोय होतेय
तेवढेच त्यांना पुरे असते
कशी पोटासाठी येतात दुष्काळ प्रदेशातून
ही अर्धपोटी माणसे
कशी हवालदिल होवून जातात
ही माणसे
ही पोरे, ह्या बायका
दुष्काळी कामासाठी दीड दमडीने विकली जातात
कशी बळी पडते दुष्काळी भागातील
एखादी स्त्री
एखादी पोर.....
कधीतरी ह्यांचे भिंग फुटते, नाही असे नाही
पण हे पक्के बिलंदर असतात

हे अलगद नामानिराळे होतात
किती कनवाळू असतात ही मोठी माणसे
ह्यांना घरात काम देवून ह्यांच्या पोटाची
काळजी घेत असतात
महान महान म्हणवून ही होत असतात
हे गेल्यावर ह्यांचे पुतळे उभारण्यास
ही मंडळी घाम गाळीत असतात
ढग भरल्या आभाळातुन
पाऊस पडो ना पडो
त्यांना ह्याचे काही घेणे देणे नसते
ह्यांच्या नळाला पाणी येतेय
तेवढेच त्यांना पुरे असते.....

रवि जाधव
(टि.वाय.बी.ए.)

परत लहान व्हायचे आहे मला .....
आईचा कुरवाळणारा स्पर्श
बाबांबरोबर शाळेत जातांना मिळणारा हर्ष.....
परत लहान व्हायचं आहे मला,
आई-बाबांच्या प्रेमाने नहायचे आहे मला !
बाहुला-बाहुली लग्न,
भातुकलीच्या खेळात तासन्तास रमेल
परत लहान व्हायचे आहे मला,
आई झोपली असतांना खाऊ पळवायचा आहे मला !
मामा-मामीच्या रम्य गावी
सगळे लाड पुरविणारे आजोबा - आजी.....
परत लहान व्हायचे आहे मला,
ए राज, ए हौशा करत बैलगाडीतून चक्कर मारायची आहे मला !
धाडसी शिवाजी महारांज्या गोष्टी,
आजोबांकडून ऐकायच्या आहेत उन्हाळ्याच्या सुट्टीत......
परत लहान व्हायचे आहे मला,
गर्क होवून अनेक गोष्टी ऐकायच्या आहेत मला !
नाचत, खेळत वाहणारं नदीचं पाणी,
इवलेसे सगळेजण..... प्रत्येकाच्या अंघोळी......
परत लहान व्हायचे आहे मला,
आजीला पूजेसाठी घाघर आणुन द्यायची आहे मला !
आकाशात लुक लुक करणारे असंख्य तारे,
मध्य रात्रीचे ते मंद, हळुवार वारे.....
परत लहान व्हायचे आहे मला,
मोठा झालो की डॉक्टर व्हायचे स्वप्न पहायचे आहेत मला !
नविन वर्ष........ नविन उल्हास
नविन गणवेश, नविन वह्या पुस्तकांच वास.....
परत लहान व्हायचे आहे मला,
परत शिस्तीत शाळेत जायचं अहो मला !
अल्लड बालपण आता नाहिसे झाले,
आयुष्यातील सगळ्यात सुंदर आठवणी मात्र ठेवून गेलो.....
परत लहान होता येणार नाही मला,
परत लहान होता येणार नाही मला.....!!


## जीवनाची व्याख्या

दु:ख – Delet
आनंद – Save
नाते – Recharge
मैत्री – Dawnload
शत्रुत्व – Erase
खरे – Broadcast
खोटे – Switch off
तणाव – Not Reachable
प्रेम – Incoming
दु:खास – Outgoing
हास्य – Inbox
अश्रू – Outbox
राग – Hold
स्मित हास्य – Send
मदत – Ok
मन – Vibrate



रवि जाधव
(टि.वाय.बी.ए.)

## गुरु ......



गुरु म्हणजे ......... खांद्यावरचा हात
गुरु म्हणजे ......... सदैव साथ
गुरु म्हणजे ......... जोडणारा स्नेहाचा कणखर धागा
गुरु म्हणजे ......... आधार
गुरु म्हणजे ......... योग्य सल्ला देणे
गुरु म्हणजे ......... वाट पाहणे
गुरु म्हणजे ......... सोबतीची हमी
आणि गुरु म्हणजे ......... लिहावं तितकं कमी....

– झरेकर पद्मा बाबासाहेब
(एफ्.वाय.बी.कॉम.)

## मैत्री ......

आहात तुम्ही सावरायला म्हणून
पडायला आवडते......
आहात तुम्ही हसवायला म्हणून
रडायला आवडते......
आहात तुम्ही सावरायला म्हणून
चुकायला आवडते
तुमच्या सारखे मित्र-मैत्रींणी आहेत म्हणून
जगायला आवडते......

## जीवन ......

जीवन – हे एक गणित आहे
सुखाने – जगायचे असते
दुःखाने – भागायचे असते
मित्र – मिळवायचे असतात
शत्रु – वजा करायचे असतात
शेवटी – उरते समाधान ही बाकी !

झरेकर पद्मा बाबासाहेब
(एफ्.वाय.बी.कॉम.)

## सुविचार ......

आईकडे अश्रुंचे पाट असतात,
पण बापाकडे संयमाचे घाट असतात
आई घराचं मांगल्य असते तर
बाप घराचं अस्तित्व असते.

## हिशेब ......

एकमेकांची जिरवण्यापेक्षा जर,
पावसाचं पाणी जिरवलं असतं तर.....
कदाचीत दुष्काळानं आपली जिरवली नसती.....

## सोनं आणि हिरा ......

एकदा राधेने कृष्णाला विचारले
कृष्णा ! प्रेम आणि मैत्री यामध्ये काय फरक आहे ?
श्रीकृष्ण हसुन म्हणाले.... राधे
प्रेम म्हणजे सोनं आणि मैत्री म्हणजे हिरा असतो.....
सोनं मोडून पुन्हा घडवता येत गं !
परंतू हिरा तुटल्यानंतर पुन्हा बनवता येत नाही....
संपूर्ण मैत्रीला समर्पित.....

– कु. पाखरे शितल अनिल (टी.वाय.बी.ए.)

# वडीलांचे आपल्या जीवनातील महत्व...

वडील हे मुलांना कधी लाडाने हसवतात,
तर कधी संतापाने रडवतात.....

वडीलांचा स्वभाव काही क्षणातच बदलतो,
म्हणून अशा वेळी मुलांचा कोंडमारा होतो.....

आई ही आपल्या जन्माची शिदोरी असते,
वडील हे आपल्या यशाचे शिखर असते,
त्यांच्या शिवाय आपले जीवन हे अपूण होऊन जाते.....

आपण नेहमी आईच्या डोळ्यातील अश्रु पाहतो,
कधी कधी वडीलांच्या डोळ्यातील पाणी पण पहावे

वडीलांना आपल्या मुलाची काळजी असते,
म्हणूनच दिवस-रात्र ते कष्ट करत असतात,
कारण त्यांचे एकच ध्येय असतं कि,
आपल्या मुलांनी जीवनात खूप मोठं व्हावं.....

वाघुले मोनिका (एफ्.वाय.बी.कॉम.)

## मैत्री....

आयुष्याच्या वेलीवर मैत्री
हे कधी न गळणारे फुल आहे
पाकळ्या गळु न देणे
हे मैत्रीचे काम आहे
त्या फुलाचा गंध म्हणजे विश्वास आहे
त्या विश्वासाची किंमत ठेवणे
हाच मैत्रिचा सन्मान आहे.

– गायकवाड रोहिणी महादेव (एफ्.वाय.बी.ए.)

# मुलींनी जगावे तरी कसे...?



मुलींनी जगावे तरी कसे ?
आणि समाजाला घाबरुन मरावे तरी कसे ?
आत्महत्या केली की म्हणतात, प्रेमभंग झाला असेल,
अशा खोट्या बदनामीला घाबरुन जगावे तरी कसे ?
आणि समाजाला घाबरुन मरावे तरी कसे ?
घराच्या बाहेर येत नसेल तर लोक म्हणतात,
घराच्या बाहेर पडण्याची हिंमत नसेल
लवकर लग्न केले तर म्हणतात
एखादे लफडे लपवायचे असेल
लग्नाला उशीर होत असेल तर म्हणतात
मुलीत एखादी खोट असेल,
खुप शिकलेली असेल तर म्हणतात
काय कामाची डोक्यावर मिऱ्या वाटेल
कमी शिकेलेली असेल तर म्हणतात
डोकेच चालत नसेल
मुलीकडे मोबाईल असेल तर म्हणतात
मुलीला बंधन नाही
आणि जर मोबाईल नसेल तर म्हणतात
मोबाईल चालवताच येत नसेल
मुलींनी या दुतोंडी दुनियेत जगावे तरी कसे ?
निरपराधी असतांना खोट्या बदनामीला घाबरुन
मरावे तरी कसे?

कु. पाखरे शितल अनिल, (टी.वाय.बी.ए.)

# 'स्त्री' शी आमचं नातं...



हा आर्त स्वर ऐकायला येतो का कोणाला ?
आर्त स्वर जाणून घ्या हो कोणी
असे किती दिवस चालणार ?
स्त्रीत्वाची, पूर्णत्वाची अपूरी कहाणी
वर्षानुवर्षे काळ लोटला हे अन्यायाचे प्रतीक
सती, अहिल्या, मंदोदरी, सीता, द्रौपदी
स्त्रियांवर अत्याचार, अन्याय
काही नामर्द पुरुष
कुठे गेली भारतीय संस्कृती आज
जगाच्या पाठीवर स्त्री सुशिक्षीत पण अशिक्षित
याला नाही उत्तर कोण उठवणार आवाज
आपली पत्नी, बहिण, मुलगी
चिमुरडी जन्माला येण्या अगोदर
घोट घेतात तिच्याच नरडीचा
तिच्यामुळे होतो उद्धार कुळांचा
स्त्री-शिवाय पुरुषांना नसते पूर्णत्व
असे धर्म सांगतो
ऋषीमुनींनो देवा ब्राह्मणांनो
पुरुषांबरोबर स्त्रीयांना देवा धर्मात
आग्रस्थान असते पुजेत
केव्हा समजणार या समाजाला
आज विचार करण्याची वेळ
हा आर्त स्वर ऐकायला येतो का कोनाला ?
हा स्वर ऐकायचा नाही तर हा आ अनेक
अनामिकांचा.......!

– गायकवाड रोहिणी महादेव (एफ्.वाय.बी.ए.)

रोजच उद्या येतो, पण आज फक्त
आजच असतो. तेव्हा आजचे काम
आज करुन टाका आणि उद्या मोकळे रहा.

छोट्याशा या आयुष्यामध्ये
खुप काही हवं असतं
असंख्य चांदण्या भरुनसुद्धा
आपलं आभाळ रिकामं असतं

हरवलेली पाखरं येतील का
पुन्हा भेटालयला......
गेलेले दिवस येतील का
पुन्हा आठवायला......
एकत्र राहून खूप हसलो, खेळलो......
शेवटच्या दिवशी मात्र रडलो......
पाहिलं आपण एकमेकांच्या
डोळ्यात सजवलेलं गाव
कधीच विसरु नका आपल्या
भाऊ – बहिणीचं नाव

जेव्हा आपली नखं वाढतात तेव्हा
आपण नखे कापतो,
बोट नाही......
त्याच प्रमाणे जेव्हा
गैरसमजातून नाती तुटायची वेळ येते
तेव्हा अहंकार तोडा, नाती नाही......

– बनसोडे सुकन्या (एफ्.वाय.बी.ए.)

# नातं वडिलांच...



आईच्या हृदयाचे गोडवे,
माहित आहे आम्हाला
पण बापाचं काळीज काय
ठाऊक आहे तुम्हाला ?
आईला काळजी असते संगोपनाची
बापालाही असते ना हो दाण्या-पाण्याची
जगाला चोचीत भरवणारी आई दिसते,
पण दाण्यासाठी कष्ट करणारा
बाप मात्र दिसत नाही
बाप झाला की कळेल प्रत्येकासी,
आपल्यासाठी त्यानं किती
सोसला असेल त्रास ?
मुलांसाठी जशी आई
झिजवते ना काया
बापही तयार असतो ना हो
पडायला दुसऱ्याच्या पाया
धृतराष्ट्राकडे होतंच ना आंधळं पुत्रप्रेम
सासरी जाणाऱ्या मुलीसाठी आईचं फाटतं हृदय
एकांतात रडून रडून बापाचं हलतं शरीर
जाऊ द्या हो हा श्रेष्ठत्वाचा वाद
शेवटी आई ही आई अन्
बाप हा बाप
पण एक मात्र नक्की
बापालाही असतो ना हो आईचा शाप !

# जीवन...




चालणारे दो पाय
किती विसंगत......
एक मागे असतो
पुढच्याला अभिमान नसतो,
मागच्याला अपमान नसतो,
कारण यांना माहित असतं......
क्षणात हे बदलणारं असतं
म्हणूनच हसत हसत
जगायचं असतं......
शब्द तरी अंतरीचे असतात
दोष मात्र जिभेला मिळतात......
मन तर स्वत:चंच असतं,
झुरावं मात्र दुसऱ्यासाठी लागतं......
ठेच पायाला लागते
वेदना मनाला होतात,
रडावं मात्र डोळ्यांना लागतं......
असंच नातं जपत-जपत जगणं
हेच तर खरं जीवन असतं......

भिंगारदिवे शकुंतला (एफ्.वाय.बी.ए.)

# हिंदी विभाग

# प्रेमचंद....



प्रेमचंद जी का जन्म ३१ जुलाई १८८० को वाराणसी के निकट लमही गाँव में हुआ था । उनका मूल नाम धनपतराय श्रीवास्तववाले प्रेमचंद को नवाब राय और मुंशी प्रेमचंद के नाम से भी जाना जाता है । उपन्यास के क्षेत्र में उनके योगदान को देखकर बंगाल के विख्यात उपन्यासकार शरदचंद्र चट्टोपाध्याय ने उन्हें उपन्यास सम्राट कहकर संबोधित किया था । उनकी शिक्षा का आरंभ उर्दू, फारसी से हुआ और जीवनापन का अध्यापन से पढने का शौक उन्हें बचपन से ही लग गया ।

आगामी एक पूर्वी पीढी को गहराई तक प्रभावित कर प्रेमचंदजीने साहित्य की यथार्थवादी परंपरा की नींव रखी । उनका लेखन हिंदी साहित्य की एक ऐसी विरासत है जिसके बिना हिंदी के विकास का अध्ययन अधुरा होगा । वे एक संवेदनशील लेखक, सचेत नागरिक, कुशल वक्ता तथा सुधी संपादक थे । बीसवीं शती के पूर्वार्ध में, जय हिंदी में की तकनीकी सुविधाओं का अभाव था । उनका योगदान अतुलनीय है ।

उर्दू मे प्रकाशीत होनेवाली जमाना पत्रिका के संपादक और उनके अजीज दोस्त मुंशी दयानारायण निगम ने उन्हे प्रेमचंद नाम से लिखने की सलाह दी । इसके बाद वे प्रेमचदं के नाम से लिखने लगे । उन्होंने आरंभिक लेखन जमाना पत्रिका में ही किया ।

ईश्वरी न्याय, लाग–डाट, सवा सेर गेहूँ, पंचपरमेश्वर, पिसनहारी का कुआँ, दोन बैलो की कथा, गुल्ली डंडा, प्रेरणा, सद्गति, शतरंज के खिलाडी, लाटरी, नमक का दारोगा, पूस की रात, प्रेम का उदय, सज्ञनता का दंड, तगादा, बडे भाई साहब, ठाकूर का कुआँ, नशा, मंत्र, रामलीला, कजाकी, इस्ताफी, गुरुमंत्र आदी उनकी श्रेष्ठ कहानियाँ है ।

उनकी कहानियाँ में भारतीय सामाजिक जीवन अपनी तमाम सचाइयों के साथ मुखारित हुआ है ।

**– भिंगारदिवे रेणुका कारभारी**
**टी.वाय. बी.ए.**

## फ्रेंन्ड

**दोस्त प्यार से भी बडा होता हैं,**
**हर सुख और दुःख में साथ होता हैं,**
**तभी तो कृष्ण राधा के लिए,**
**नहीं सुदामा के लिए रोता हैं,**
**क्योंकि हर एक फ्रेंड को**
**एक फ्रेंड का साथ**
**जरुरी होता हैं ।**

**- फंड ज्योती आसाराम**
**(एफ.वाय. बी.ए.)**

# मातृभूमि......

मेरे देश की धरती
सोना उगले उगले हिरे मोती
मेरे देश की धरती

सचमुच मेरे देश की धरती ने हमे सोना, हिरे, मोती ही प्रदान किये है । हमें हमारी मातृभूमि का आदर, सम्मान करना चाहिए । हमारी मातृभूमि १५० वर्ष अंग्रेजोंकी कब्जेमे थी इस मातृभूमि के आजादी के लिए हिरे मोती के रुप में अनेक वीर लडे है उन्होने मातृभूमि के आजादी के लिए अपने प्राणोंका सहर्षबलिदान दिया है । अनेक महान हस्तियोंने भूमि रक्षण तथा उसकी सौंदर्यवृध्दी के लिए योगदान दिया है । इसी मातृभूमि की लगन की आस से वि.दा. सावरकरजी कहते है –

‘ ने मजसी परत मातृभूमि ला
सागरा प्राण तळमळला ‘

हमारी इस भूमि कें अनेक संतो का जन्म हुआ है । उन्होंने पूरे तन–मन से समाज सेवा करके मातृभूमि की सेवा की है। अनेक वीर इस भूमि में पैदा हुए है । उनकी नस–नस में भारती मी मिट्टी छायी हूई है । इसी कारण जो आजादी की जंग में अनेक वीरों कों वीरगती प्राप्त हुई है । और आज भी अनेक प्राणों को समर्पित कर देते है । गाँवमे किसान बडे लगावसे काम करते है । ‘काळ्या आईची ओटी भरतो’ ताकि मेरा सब्र का फल मिठा हो जायेगा । इसी सेहत कष्टप्रद नही बल्की खुशी से आरामदायी जीवन बिताते है । इद खुशी के कारण हमें याद रखना चाहिए । डॉ. राजकुमार वर्मा लिखते है

‘‘जिस भारत की धुल लगी है
मेरे तन और मन से क्या
मै भूल सकता हूँ उसे कभी
जीवन में मै भारत का हु सदा
और भारत मेरा देश है ...

इस माती की गोद मे अनेक इतिहासकारोंने विद्वानोंने ने जन्म लिया है । और इसी सस्य सुजलाम्, सुफलाम् मातृभूमिपर हमे गर्व होना चाहिए । हमारा तो इस मातृभूमि से बहुत गहरा रिश्ता है । हमारा और उसका माँ बेटी का रिश्ता है । मातृभूमि हमारे माता समान है । हाँ ! माता ही है । जैसे पुरे घरका द्वारका खयाल करती है वैसे मातृभूमि पूरे संसार का खयाल करती है । अगर माँ अपने बेटों को कभी भूखा प्यासा नही देख सकती । मै तो मेरी धरणीमाता को नही भूल सकती । हम सब बचपनमे इसकी गोद मे खेल कुदकर बडे हुए है इसका और हमारा अनोखा रिश्ता है । मातृभूमि से हर एक व्यक्ति का गहरा रिश्ता होता है और यह गहराई प्राचीन काल से दिखाई देती है ।

**– शिंदे सुप्रिया राजाराम (एफ्. वाय. बी.ए.)**

## मावळे आत्ताचे......

**आधीचे मावळे....**
**लवकर उठे, शेतात सुटे**
**तलवार तुटे पण पिछे न हटे**
**आताचे मावळे......**
**उशीरा उठे, पोरीमागे सुटे**
**थोबाड फुटे पण पोरगी न पटे**

**– गायकवाड रोहिणी महादेव (एफ्.वाय.बी.ए.)**

# माँ कौन होती है ?

**शिक्षक ने कहा** – माँ एक ऐजी हंसी होती है, जो औलाद के लाखो गम अपने सिने में छुपा लेती है ।
**शायरने कहा** – माँ एक ऐसी गझल है, जो हर सुननेवाले के दिले में उतर जाती है ।
**माली ने कहा** – माँ गुलिस्ताँ का ऐसा खुबसुरत फुल है, जिसमे तमाम खुबसुरत फुल है ।
**कवी ने कहा** – माँ वो हँसी है, जिसकी तारीफ के लिए अल्हाज नहीं मिलते ।
**खुदा ने कहा** – माँ मेरी तरफ से किमती और नायाब तोहफा है ।
**माँ ममता की अनमोल दास्तान है, जो हर दिल पर कुर्बान हो जाती है ।**

**– फंड ज्योती आसाराम (एफ.वाय. बी.ए.)**

# बेटी

बेटी बनकर आयी हूँ
माँ-बाप के जीवन में
बसेरा होगा कल मेरा
किसी और के आँगन में
क्यां यह रीत भगवान ने
बनाई होगी
कहते है आज नहीं तो
कल तू पराई होगी
देकर जन्म पालपोसकर
जिसने हमें बडा किया
और वक्त आया तो उन्ही
हाथों से हमें विदा किया
बेटियों इस समझकर
परिभाषा अपने जीवन की
बना लेती है अभिलाषा
एक अटूट बंधन की
क्यों रिश्ता हमारा इतना
अजीब होता है, क्या बस
यही हम बेटियों का नसीब होता है ।

- फंड ज्योती आसाराम (एफ.वाय. बी.ए.)

# चष्मा

मैने तुझको देखा, देखता रहा, देखताही रह गया ।
मैने तुझको देखा, देखता रहा, देखताही रह गया।
फिर एक दिन अचानक मुझको चष्मा लग गया ।

# भूत

क्या आँखे है, क्या चाल है, क्या चेहरा तुमने पाया है,
क्या आँखे है, क्या चाल है, क्या चेहरा तुमने पाया है,
अरे ऐसा लगता है की,
जैसे पिपल के पडे से भूत उतर के आया है ।

– गव्हाणे कावेरी, टी.वाय. बी.कॉम

# शेरो शायरी



पढाई
सब कहते है, तुम सुंदर हो,
तुम्हारी सुंदरता से चाँद की,
सुंदरता अच्छी...
चाँद की सुंदरता से पर्वत की उँचाई अच्छी...
पर्वत की उँचाई से समंदर की गहराई अच्छी
इन बातो को छोद दो यारो
इन सबसे अपनी पढाई अच्छी....

## किससे क्या सीखे ?

माता-पिता की सेवा - श्रवण कुमारसे
मित्रता - श्रीकृष्ण से
मर्यादा - श्रीराम से
गुरुभक्ती - एकलव्य से
धर्म - युधिष्ठीर से
तपस्या - श्री महावीर से
त्याग - महर्षी दधीपिसे
ब्रह्मचर्य - भीष्म पितामह से
भक्ती - प्रल्हाद से
दान करना - कर्ण से
सेवा - हनुमान से

- गव्हाणे कावेरी, टी.वाय. बी.कॉम.

जो हम सब को अच्छे लगते है,
उन्हे पापा कहते है,
जो हम सब को प्यारी है
उसे माँ कहते है,
जो अपने इन बच्चो के लिए
भगवान से प्रार्थना करती है
उसे दादी कहते है,
जो हमेशा इन सब की
खुशियो के लिए लडता है
उन्हे दादाजी कहते है और
जो इन सभी की इच्छा पुरी करनेवाला है
उसे भगवान कहत है ।

- बनसोडे सुकन्या, एफ.वाय. बी.कॉम.

प्रत्येकाशी प्रेमानचं वागलं पाहिजे
जे आपल्याशी वाईट वागतात
त्यांच्याशीही प्रेमानं वागलं पाहिजे
ते चांगले आहेत म्हणून नाही तर
आपण चांगले आहोत म्हणून

सितारो की भीड से और
सूरज की किरणो से
चुराया है, लाखो में एक
कॉलेज हमारा है

- बनसोडे सुकन्या, एफ.वाय. बी.कॉ.

## *College Cricket*

***Batsman** - Students*
***Bowler** - paper Setter*
***Umpire University** - Pune*
***Sewers** - Examiners*
***Play round Examinations** - University*
***Spectators** - Guardians*
***Commentators** - Mark Sheets*
***Expert Comments** - Classmates*
***Sixes** - Distinction*
***Four** - First Class*
***Follow on Exam** - Supplementary*
***Yorker** - Compulsory*
***Question** -*
***Googly Pattern** - Changed*
***Bouncer From Optional topic** - Question*
***Umpires Decision** - 40/100*
***Clean Bowled** - Failed*
***O ! It's No Ball revaluation** - Passed in*
***Silly Point** - Printing Mistake*

***- Kardile Poonam - F.Y. B.Com***

# हार नही होती...

लहरों से डरकर नौका पार नहीं होती,
कोशिश करनेवालों की हार नहीं होती ।

नन्ही चीटी जब दाना लेकर चलती है,
चढती दीवारो पर सौ बार फिसलती है,
मन का विश्वास रंगो मे साहस भरता है,
चढकर गिरना, गिरकर चढना न अखरता है,
आखिर उसकी मेहनत बेकार नही होती,
कोशिश करनेवालों की हार नहीं होती ।

डुबकियाँ सिंधु में गोतखोर लगाता है,
जा जाकर खाली हाथ लौट आता है,
मिलते न सहज ही मोती गहर पानी में,
बढता हुआ उत्साह इसी हैरानी में,
मुठठी उसकी खाली हर बार नही होती,
कोशिश करनेवालों की हार नहीं होती ।

असफलता एक चुनौती है, स्वीकार करो,
क्या कमी रह गई, देखो और सुधार करो,
जब तक न सफल हो, नींद चैन की त्यागो तुम,
संघर्षो का मैदान छोड मत भागो तुम,
कुछ किए बिना जय जय कार नही होती,
कोशिश करनेवालों की हार नहीं होती ।

– वाघुले मोनिका आसाराम
एफ.वाय. बी.कॉम.

# माँ.....



शब्दो से गाऊँ
माँ तेरे ही गुणगाण
तेरी कमी से जीवन मेरा
सचमुच हो जाएगा सुनसान ।
तेरी ही गोद मे माँ
मैं सोती थी जब
मेरे लिए अंगाई गीत,
गाती थी तब ।
रेगीस्तान जैसे जीवन में
भडका था शोला
तेरी ममता की बूँदो से,
वो भी बुझ गया था ।
तेरे बडप्पन से माँ
अंबर भी झुकता था,
इसलिए माँ तेर गर्व मे
मेरा उछलता है सीना ।
मेरी गोद में माँ
मैं स्वर्ग के दर्शन पाती हूँ
तेरी रक्षा करने के लिए
है दुनिया सभी लडती ।
मेरे सभी अपराध
तेरी ऑसूओ में बहने का
वादा करती हूँ माँ
तेरे चरणो पर रहने का ।

– वाघुले मोनिका आसाराम
एफ.वाय. बी.कॉम.

# बेवफा....

एक अंधी लडकी थी
जिसको सबने ठुकराया था...
सिवा उसके दोस्त के
वह उसे बहुत चाहता था....
लडकी रोज कहती थी
काश मै तुम्हे देख सकती
तो तुमसे शादी करती
एक दिन किसी ने
उस लडकी को आँखे डोनेट की,
जब लडकी ने उस दोस्त को देखा,
तो वह अंधा था
दोस्त ने पुछा...
क्या तुम मुझसे शादी करोगी ?
तो लडकी ने इन्कार कर दिया
लडका मुस्कुराया
और उसे एक खत देकर चला गया
उसमे लिखा था

***Please take care of my eyes...***

– कांबळे रुचिका चंद्रकांत (एस.वाय., बी.कॉम.)

जीवन जगत असतांना
त्याच्याकडून ***Friends***
मिळवायचे असतात.
शत्रू वजा करायचे असतात
त्याला सुखाने गुणायचे असते
दु:खाने भागायचे असते
बाकी मिळेल त्याला
समाधान मानायचे असते
त्यालाच जीवन म्हणायचे असते.....

# *Digital India*

*Digital India is an initative by the Government of India to ensure that Government Services are made availabe to Citizen Electronically by improving online infrastructure and by increasing Internet connectively. It was launched on 1 July 2015 by prime minister Narendra Modi,*

*The Initiative Includes plans to connect rural areas with high-speed Internet networks. In Addition, there are plans to restructure the Nation Informatics Centre. This project is one among the top priority Projects of the Modi Administration.*

*The Digital India Project is Broadbank in 2 lack Villages, universal phone connectivity, Net zero Imports by 2020, 400000 public Internet Access points, Wi-fi in 2.5 lakh schools, all universities, public Wi-Fi hotspots for citizens, Digital Inclusion, 1.7 Cr. trained for IT, Telecom and Electronics Jobs creation. Direct 1.7 Cr. and Indirect at least 8.5 Cr. e-Goverance & eservices. Across Government.*

*Digilocker - Digital locker facility will help citizens to digitally store their important documents like PAN CARD, Passport, Mark sheets and degree Certificates, Digital locker will provide secure auess to Government issued documentry. It user authenticity services provided by Aadhar Digital India is making, so noise now a days. So support digital India for making India brighter.*

# *Swami Vivekanand - A Gem of India*

*Swami Vivekanand was a Hindu mank from India. He was born on 12th January 1863 in Culcatta (Kolkatta). His real name was Narendranath Dutta. His fathers name was Vishwanath Dutta and his mothers name was Bhuvaneswari Devi. Narendranath acquired the name "Swami Vivekananda" when he became a mank. As a child he was very lively and naughty just like a normal innocent child. He was good in studies as well as ini games. He studied instrumental and vocal music and also practiced meditation from a very early age.*

*According to Swamiji Education is the manifestation of the perfection already in man. He believed in ''Man Making Education, hence he defined education as The training by which the current and expression of will are brought under control and become fruitful is called Education.'' Also he prepares the scheme for this man making education through his over-all philosophy of Vedanta. According to Vedanta, the essence of man lies in his soul, which he prosses in addition to his body and mind.*

*Swamiji not only gave the importance of Education but also gave the benefits of Mind control in an individual's life, He said that an uncontrolled mind leads to negatively in life and a controlled mind saves us. He gave an idea that Self awareness, will power and determination are the best ways to control one's mind. So he advised meditation, which means that the mind is turned back upon itself and stops all thought waves. Your consciousness expands. Every time you meditate you will keep your growth.*

*Even today Swamiji guiding us through his books, messages and nise guotes like.*

*'Take Risks in Your Life,*
*If you win, You can Lead !*
*If you win, You can Guide !'*

***- Prof. Dhiman Priya R.***
***Dept. of Physics***

## *Balance Sheet of Life....*

*What comes your credit*
*What goes your debit*
*The Birth is opening Stock*
*Your ideas are assets*
*Your views are liabilities*
*Your happiness is profit,*
*Your sorrow is goodwill*
*Your soul is fixed assets*
*Your duties are out standing expenses*
*Your friendship is hidden adjustments*
*Your character is capital*
*Your knowledge is investments*
*Your mind is bank balances*
*Your thinking is current accounts*
*Your behavior is journal entry*
*Bad thing always depreciate !*

*- Sanket Kale (T.Y. B.Com)*

## Passionate Love

*Hey dear, how shall I tell you,*
*How much I love you ?*
*You are my love and my life*
*An only your hope keep me alive*
*You are the only one*
*Who come into my life*
*You are the only one*
*Who loved and appreciated me*
*My passionate eyes are waiting*
*Desperately to see you*
*So! Pray always to*
*Every ray of sunlight*
*My Heart beats very fast*
*As I think of you face bright*
*And I hope that you*
*Will soon be in my Sight*
*I recall those memories over*
*and over again*
*Through day and night without mirth*
*Dear, Shower your love upon me*
*As the cloud shower rain upon*
*The thirsty earth*

***- Kamble Ruchika Ramchandra***

## Mathematical Wedding Invitation

*Mr. & Mrs. Mathematics*
*Requested the pleasure of*
*your addition*
*On algebric occasion of the union*
*of their oldest son*
***Mr. Statistic***
***with***
***Miss Geometry***
*(Eldest daughter of Mr. Trigonometry)*
*On the fool day, 35th April 2000*
*All set function Hall Systemetically lane*
*Integress street, Arithmatic city with*

***best compliment from***
*Exponant and Redicals*
*Rational numbers,*
*Near and Dear*

***- Sanket Kale (T.Y. B.Com)***

---

फुलं खाली पडतील
पण सुगंध नाही.....
चंद्र खाली जाईल
पण तारे नाही.....
नदीतील पाणी संपेल
पण सागरातले नाही.....
तुम्हाला सारं जग विसरेल
पण तुमची आई नाही.....

थंडी क्षणांची,
पण गारवा कायमचा.....
ओळख क्षणांची,
पण आपुलकी कायमची.....
भेट क्षणांची,
पण नाती आयुष्यभराची.....
सहवास क्षणांचा,
पण ओढ कायमची
ही खरी मैत्री मनाची.....

आई म्हणजे सर्व काही
वर्णन करण्यास शब्दकोष नाही
हरवले असतील त्यांचे
बालपणीचे आईचे छत्र
कोण देणार त्यांना हा
जीवनाचा मंत्र.....

## Our Accountancy in Life....

*Birth is our - Opening Stock*
*Behavior is our - Journal Entry*
*Thinking is our - Ledger Posting*
*Character is our - Capital*
*Heart is our - Fixed Asset*
*Rights are our - Current Asset*
*Duties are our - Liabilities*
*Ideas are our - Intangible Asset*
*Views are our - Personal Liabilities*
*Soul is our - Goodwill*
*Mind is our - Bank Balance*
*Knowledge is our - Investment*
*Marriage is our - Adjustment*
*Happiness is our - Profit*
*Sorrow is our - Loss*
*Good things we should - Appreciate*
*Bad things we should - Depreciate*
*Human Relationship is our - Balance sheet*
*Death is our - closing stock*

## life is Something

*Life is Something we all share,*
*Just like oxygen in our,*
*The way we live it is up to us*
*with a negative or with a plus*

*Life is Something we should Cherish*
*we never know, When we'll perish*
*Live each and every single day,*
*Smell the flowers, Stop and play*

*Life is Something, we've bean blessed*
*Choice is your choose your guest*
*follow your passions you'll be fine,*
*With the right attitude you will shine*

*Life's too short, to just complain*
*Rid negativity from your brain*
*Lifes too short, time won't freoze*
*Enjoy it all, won't you please.*

***- Ankita Satish Kanojiya***
***F. Y. B.Sc.***

## Only For you

*I attend class*
*Only for you...*
*My visiting library*
*is Only for you...*
*Meeting teacher also*
*is Only for you...*
*My sleep ess nights*
*Are Only for you...*
*My future depends*
*Only for you...*
*Oh ! my dear exam*
*My devotion is*
*Only for you...*

***- Imran Maheboob Shaikh***

# कॉलेज .....



कॉलेज के मधुर क्षण
फिर ना वापस आयेंगे,
सोच लो ये दोस्ती
कल हम सब जुदा हो जायेंगे ।
भूल सकोगे क्या कभी
कॉलेज जीवन की ये कहानी,
याद करके आँखे भरेंगे
आएगी जब याद पुरानी
आज तुम हो, आज हम है
यह कॉलेज हमारा,
याद इसे रखलो
कल न मिलना हो हमारा,
कितने यहाँ से पढकर गए
कल कितने आनेवाले है
आज यहाँ जो पढ रहे है ।
हम-तुम ना रहे
कॉलेज हमारा अमर रहेगा,
छात्र चाहे बदलते रहे
उनकी कहानियाँ अमर रहेगी ।
मेरी बस छोटीसी ही तमन्ना
अपने कॉलेज के
दोस्तों को कभी न भुलना ।

संकेत काळे (टि.वाय.बी.कॉम.)

# शेरोशायरी

दिल में प्यारी सी मुस्कान बनाए रखना
कुछ ना होतो भी यादों का सजाए रखना
चाहे ना हो मुलाकात के सिलसिले तब भी ये
खुबसुरत दोस्ती बनाए रखना......

श्रद्‌धा ज्ञान देती है
नम्रता मान देती है
योग्यता स्थान देती है
तिनो मिल जाए तो सन्मान
देती है....

दोस्त दोस्त होता है
दोस्त भगवान होता है
दोस्त का एहसास तब होता है,
जब दोस्त दोस्त से जुदा होता है....

कोई आपके लिए
रुपये खर्च करेगा,
तो कोई
समय खर्च करेगा.
समय खर्च करनेवाले
व्यक्ती को हमेशा अधिक
महत्त्व और सन्मान देना क्योंकि....
वह आपके पिछे आपने जीवन के
वो पल खर्च कर रहा है जो उसे कभी
वापस नही मिलेंगे.....

# मराठी विभाग अहवाल

श्री. बाणेश्वर महाविद्यालयात विशेष स्तरावरील मराठी विभाग हा सन २००४–०५ पासून कार्यरत आहे. या विभागाच्यावतीने सतत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त नेहमीच वेग–वेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

शैक्षणिक वर्षे २०१४–१५ मध्ये परीक्षेत बसलेल्या सर्व वर्गांचे निकाल उत्कृष्ट लागले आहेत. द्वितीय वर्षे कला(मराठी विभाग) पाखरे शितल ही प्रथम आली तर दळवी पल्लवी ही दुसरी आली व सुसे सोपान ह्याने तिसरा क्रमांक मिळविला. तृतीय वर्षात गोरखे सागर हा प्रथम, मनिषा कर्डिले ही द्वितीय व जाधव सपना ही तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. अशी ही यशाची परंपरा या विभागाने कायम ठेवली आहे.

मराठी विभागाच्या वतीने नेहमीच विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जात असते. याचाच भाग म्हणून प्रथम वर्ष बी. ए. मध्ये प्रवेश होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ २०१५–१६ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच गुरुपौर्णिमा व शिक्षक दिन या कार्यक्रमाचे आयोजन ही या विभागाच्यावतीने करण्यात आले..

मराठी विभागाच्या वतीने विभागातील विविध चर्चासत्र व विविध कार्यक्रमात सहभाग घेण्यास पाठविले जाते. राहुरी महाविद्यालयात झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. डॉ. वर्षा कीर्तने यांनी लोकसाहित्यावर शोधनिबंध सादर केला व त्यांच्या स्मरणिकेत प्रकाशितही झाला. या बरोबरच मराठी विभाग प्रमुख डॉ. भाऊसाहेब मुळे यांनी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाबळ, जि.पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षक म्हणून काम पाहिले.

या बरोबरच महाविद्यालयात २७ फेब्रुवारी २०१५ रोजी मराठी राजभाष दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले गेले तसेच अनेक विद्यार्थ्यांना या दिनाचे महत्व सांगून कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला. या व्यतिरिक्त विविध उपक्रम मराठी विभागाच्या वतीने चालविले जातात. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमावर नियमितपणे अध्यापन केले जाते.

**मराठी विभाग प्रमुख**
**प्रा. डॉ. भाऊसाहेब मुळे**

## Department of English

The department of English and the faculty has been working intentionally for the enhancement of student's dinguistic as well as literary skills, which will become the major cause for their employability in this global world.

The department has been contributing for the betterment of students ever since the college has started. In this academic year (2015-2016) various class room activities were conducted for the students such as group discussion, role play, poetry recitation, class room seminars linguistic games etc. These kind of activities are important and play a vital role to gain confidence and lingnistic competence in students.

In this academic year the faculty prof. Pravin C. Nagawade presented a paper in state level seminar held at New Arts, Commerce and Science College, Ahmednagar.

**Prof. Pravin C. Nagwade**
**Head Dept. of English.**

## इतिहास विभाग अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली आणि तेव्हापासून इतिहास विभाग कार्यरत आहे. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी गुणवत्ता वाढीसाठी आणि विद्यार्थ्यांमधील संभाषण कौशल्य आदी गुण विकसित होण्याच्या दृष्टीने इतिहास विभागातर्फे गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. व्यक्तीमत्व विकासासाठी व्याख्यानाचे आयोजन केले गेले त्या माध्यमातून भविष्यात येणाऱ्या सर्व अडचणींना धैर्याने सामोरे कसे जावे. स्वसंरक्षण कशा प्रकारे केले जावे हे सांगण्याचा प्रामुख्याने प्रयत्न केला. जो आजच्या काळामध्ये आवश्यक आहे.

इतिहास विभागाच्या वतीने विविध चर्चासत्रामध्ये इतिहासाचे प्राध्यापक सहभाग घेतात. बाबुजी आव्हाड, पाथर्डी येथील महाविद्यालयामध्ये झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. सोनवणे एस.आर. यांनी शोधनिबंध सादर केला. तसेच महिला महाविद्यालय, नगर येथील महाविद्यालयामधील चर्चासत्रात सहभाग घेतला.

अशा प्रकारे इतिहास विभागातर्फे विद्यार्थी व प्राध्यापक ह्यांच्या व्यक्तीमत्व विकासाच्या प्रयत्नाबरोबरच सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, निमित्ताने इतिहास विभागांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन केले गेले त्यामार्फत त्यांच्या जीवन चरित्राचा पट मांडण्यात आला. त्यामध्ये या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

**प्रा. सोनवणे एस.आर.**

## हिंदी विभाग अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय में २००४-०५ से हिंदी विभाग कार्यरत है । २०१२-१३ से विशेष स्तर पर यह विषय पढाया जाता है। हिंदी विषय में छात्रों की रुचि बढे इसलिए अन्य महाविद्यालयों के अध्यापकों को व्याख्यानों के लिए महाविद्यालय में आमंत्रित किया जाता है।

महाविद्यालय में दरवर्ष १४ सितंबर हिंदी दिवस के रुप में मनाया जाता है । इस वर्ष भी इसका आयोजन महाविद्यालय में किया गया था । महाविद्यालय के प्राध्यापक शेख आर.एच. इन्होंने इस वर्ष ५ अगस्त २०१५ मे पी. एचडी. की उपाधिक प्राप्त की । उसी प्रकार न्यू आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय में राष्ट्रीय सेमिनार मे हिस्सा लिया ।

प्रा.डॉ. शेख राजमोहंमद हसन इन्हे सन २०१५-१६ को डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित साहित्य अकादमीके डॉ. बाबासाहेब आंबेडकर फिलोशिप अवार्ड से सन्मानीत किया गया है ।

इस प्रकार महाविद्यालय का हिंदी विभाग कार्यरत है ।

**- प्रा. डॉ. शेख आर. एच. (हिंदी विभाग प्रमुख)**

# भूगोल विभाग
# अहवाल २०१४-१५

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बुऱ्हाणनगर या महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली. महाविद्यालयामध्ये भूगोल विभाग स्थापनेपासून कार्यरत आहे. या विभागामध्ये विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन व विनयोग, जलसंधारण, प्रदुशण एक समस्या, निसर्गाच्या सान्निध्यात चला, निसर्ग वाचवा अशा अनेक उपक्रमाद्वारे सर्व सामान्य व्यक्तीमध्ये याची माहिती दिली जाते.

महाविद्यालयामध्ये १४ जानेवारी २०१६ हा दिवस भूगोल दिन म्हणून करण्यात आला. या दिवशी मान्यवरांची व्याख्याने आयोजित करुन वसुंधरा वाचवा या विषयांतर्गत भित्तीचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रश्न मंजूषा कार्यक्रम घेण्यात आला.

या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अहमदनगर महाविद्यालयामध्ये भूगोल दिनानिमित्त प्रश्न मंजूषा मध्ये सहभाग घेतला. यामध्ये कुमार रवि जाधव, हजारे अविनाश व जायभाय अजित या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला व महाविद्यालयाचे नाव प्रकाशित करण्यात प्रयत्न केला.

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये भूगोल विषयाचा निकाल १००% असून विषयामध्ये चांगले यश मिळविले आहे. अशा प्रकारे महाविद्यालयामध्ये भूगोल विभाग कार्यरत आहे.

**प्रा. साठे बी.जी.**
**भूगोल विभाग**

# राज्यशास्त्र विभाग
# अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र हा विषय सुरु करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये मान्यता देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून महाविद्यालयात राज्यशास्त्र हा विषय एफ.वाय. बी.ए. साठी सुरु करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये एफ.वाय. बी.ए., एस.वाय. बी.ए. व टी.वाय. बी.ए. साठी राज्यशास्त्र विषय अभ्यासण्यास आहे. राज्यशास्त्र विषयासाठी प्रथम वर्षाचे ४८ विद्यार्थी. द्वितीय वर्षाचे ३५ विद्यार्थी व तृतीय वर्षाचे ३४ विद्यार्थी प्रवेशित आहेत.

राज्यशास्त्र विषयाचा विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी तसेच उत्तम नागरिक होण्यासाठी उपयोग होईल. राज्यशास्त्र विभागास प्राचार्य डॉ. ए.एस. जाधव व उपप्राचार्य डॉ. व्ही.एम. जाधव यांचे नेहमीच मोलाचे मार्गदर्शन लाभते.

**- प्रा. खांदवे एस.टी.**

# वाणिज्य विभाग
# अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून वाणिज्य पदवी अभ्यासक्रम चालविला जातो.

या विभागांतर्गत प्रथम ते तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमातून वेगवेगळ्या २१ विषयांचे अध्यापन केले जाते.

विपणन व्यवस्थापन आणि कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकौटिंग हे दोन विषय द्वितीय व तृतीय वर्षात विशेष स्तरावर शिकविले जातात.

अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षापासूनच वाणिज्य शाखेच्या सर्व वर्गांच्या निकालाची परंपरा समाधानकारक आहे. त्याचप्रमाणे या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही प्रत्येक वर्षी वाढते आहे.

या शैक्षणिक वर्षात २०१५-१६ मध्ये वाणिज्य शाखेच्या सर्व वर्गांच्या निकालाची परंपरा समाधानकारक आहे. त्याचप्रमाणे या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही प्रत्येक वर्षी वाढते आहे.

या शैक्षणिक वर्षात २०१५-२०१६ मध्ये वाणिज्य शाखेच्या तीनही वर्गांची एकूण विद्यार्थी संख्या ३१२ इतकी आहे.

अभ्यास क्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना उत्तेजन देणारे विविध कार्यक्रम, मान्यवरांची व्याख्याने राबविली जातात.

या विभागातील सर्वच शिक्षक सहकारी विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करत असतात.

**– प्रा. प्रवीण सी. नागवडे**
**वाणिज्य विभाग प्रमुख**

## अर्थशास्त्र विभाग अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र हा विषय कला व वाणिज्य शाखेत शिकवला जातो. वाणिज्य शाखेत प्रथम व द्वितीय वर्षांसाठी व्यावसायिक अर्थशास्त्र व तृतीय वर्षासाठी आर्थिक विकास आणि नियोजन हे विषय शिकवले जातात. तसेच अर्थशास्त्र विषयाबद्दल विद्यार्थ्यांना आवड आहे.

सन २०१३-१४ मध्ये प्रथम कला शाखेत अर्थशास्त्र विषय सुरु झाला. प्रथम वर्ष कला शाखेत भारतीय अर्थव्यवस्था समस्या आणि भवितव्य हा विषय सुरु केला व नंतर सन २०१४-१५ मध्ये द्वितीय वर्षासाठी आधुनिक बँक व्यवसाय हा विषय सुरु झाला व नंतर सन २०१५-१६ मध्ये तृतीय वर्ष कला शाखेमध्ये हा विषय सुरु झाला. तसेच विद्यार्थ्यांना आर्थिक संकल्पना जाणून घेण्याची आवड असल्याने अर्थशास्त्र विषयाबद्दल विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन जाणवतो. नोकरी मिळविण्यासाठी व स्पर्धा परीक्षा तयारीसाठी अर्थशास्त्र विषय महत्वाचा असल्याने वाणिज्य व कला शाखेतील विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषयाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला.

**– प्रा. जाधव के. एस.**

## बी.एस्.सी. (कॉम्प्युटर सायन्स) विभाग अहवाल २०१५-१६

सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून विज्ञान शाखे अंतर्गत बी.एस्.सी. (कॅम्प्युटर सायन्स) हा अभ्यासक्रम कार्यरत आहे. प्रथम ते तृतीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही प्रोफेशनल कोर्समध्ये ज्ञान मिळावे व त्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी या कोर्सचा पाया घालण्यात आला.

या विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी सॉफ्टस्किल विषयांचे लेक्चर्स, वेगवेगळया महाविद्यालयातील अनुभवी प्राध्यापकांचे सेमीनार तसेच विविध प्रकारचे वर्कशॉप घेतले आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बुध्दीमत्तेत वाढ

करण्यासाठी ग्रंथालयात पाठ्यपुस्तकांखेरीज, रेफरन्स पुस्तकांचे, तसेच विविध शैक्षणिक सुविधांची व्यवस्था करण्यात आली. तसेच कॉम्प्युटर लॅबमध्ये इंटरनेटची व्यवस्था करण्यात आली. तसेच मॅथेमॅटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर या विषयांची जर्नल्स मागविण्यात आली आहेत.

तसेच प्राध्यापकांना नवनवीन तंत्रज्ञानाबाबत अद्ययावत करण्यात येते.

विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना वाव देण्यासाठी विविध प्रकारेच इनडोअर-आऊटडोअर गेम्स आयोजित करण्यात आले. तसेच मराठी दिवस, विज्ञान दिवस साजरे करण्यात आले. यासाठी प्राचार्य, उपप्राचार्य यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

**- भुजबळ ए.आर.**

## भौतिकशास्त्र विभाग
## अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली.

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून बी.एससी हा अभ्यासक्रम सुरु करण्या आला. त्याअंतर्गत भौतिकशास्त्र हा विषय प्रथम व द्वितीय वर्षासाठी कार्यरत ओ. या ३ वर्षात असे पाहण्यात आले आहे की, भौतिकशास्त्र या विषयाबद्दल मुलांमध्ये गोडी निर्माण होत आहे आणि त्यामुळे विद्यार्थी संख्येत वाढ झालेचे असे निदर्शनास आले आहे.

विदयार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर देण्यासाठी विविध प्रकारचे उपकरणे व विषयाशी निगडीत असणाऱ्या साहित्यांनी प्रयोगशाळा सुसज्ज आहे. तसेच मुलांच्या शैक्षणिक बुध्दीत वाढ करण्यासाठी प्रयोगशाळेत संगणक सुविधा उपलब्ध आहे.

प्रा. धिमान प्रिया आर. यांनी म्हैसुर येथे आंतरराष्ट्रीय पाच दिवसीय आयोजित *The Indian Science Congress Association* परिषदेत आणि तसेच २ दिवसीय राष्ट्रीय *Educational Research & Applications of Statistics for Inter Disciplinary Research* कार्यशाळेत सहभाग घेतला.

हे सर्व करताना संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. गिते एन.आर.** **प्रा. धिमान पी.आर.**
**भौतिकशास्त्र विभाग**

## रसायनशास्त्र विभाग
## अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना सन २००८ मध्ये झाली. आरंभी फक्त कला व वाणिज्य या दोन शाखा कार्यरत होत्या. मात्र त्यानंतर वाढती विद्यार्थी संख्या व विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता सन २०१३-१४ मध्ये विज्ञान शाखा सुरु करण्यात आली.

नैसर्गिक वाढीने हाच वर्ग टी.वाय. बी.एस्सी पर्यंत गेला आणि या वर्गात विशेष स्तरावर रसायनशास्त्र हा विषय सुरु करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रथम वर्ष बी.एस्सी. या वर्गात ८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर द्वितीय वर्षात ३० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करण्यासाठी महाविद्यालयाने सुसज्ज अद्ययावत व सर्व सुविधांयुक्त अशी प्रयोगशाळा तयार केली आहे.

या विषयाचे प्रात्यक्षिके वेळेवर पूर्ण झालेली आहेत.

तसेच अध्यापनासोबतच महाविद्यालया तील प्राध्यापक महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये भाग घेतात. विविध महाविद्यालयामध्ये होणाऱ्या चर्चासत्रास संशोधन परिषद कार्यशाळेस उपस्थित राहतात.

**– प्रा. मोहिते सी.पी.**
**बी.एस्सी (केमिस्ट्री विभाग)**

# वनस्पतीशास्त्र विभाग
# वार्षिक अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ पासून सुरुवात झाली. त्यानंतर सन २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली. तेव्हापासून वनस्पतीशास्त्र हा विभाग महाविद्यालयामध्ये कार्यरत आहे. यामध्ये प्रथम वर्षापासून, द्वितीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहे.

या विषयासाठी वर्षाचे ६० विद्यार्थी व द्वितीय वर्षाचे ३० विद्यार्थी प्रवेशित आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात वाढ करण्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये उत्कृष्ठ प्रतीचे मायक्रोस्कोप, स्लाइड, चार्टस् तसेच उच्च दर्जाचे उपकरणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे नविन संशोधन कार्यात विकास होण्यासाठी प्राध्यापकांना विविध परिषदा व कार्यशाळेला पाठविण्यात आले होते. त्यामध्ये प्राध्यापिका वाघ एस.जी. यांनी 'Biodiverstiy of India past, present & future 2015, Biodiversity & Environment' त्याचप्रमाणे 'Educational Research & Applications of statics for Inter disciplinory Research ''Recent Trends in Theoretical & Experimental Sciences.'

या राष्ट्रीय वनस्पतीशास्त्र विभागामध्ये उत्कृष्ठ निकालची परंपरा कायम कार्यरत आहे व प्राचार्य व उपप्राचार्य सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापिका यांचे मार्गदर्शन लाभले.

**– प्रा. वाघ एस.जी.**
**वनस्पती शास्त्र**

# प्राणीशास्त्र विभाग
# अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ पासून झाली. त्यानंतर सन २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली. तेव्हापासून प्राणीशास्त्र हा विभाग कार्यरत आहे.

या विभागांतर्गत प्रथम वर्षापासून, द्वितीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहे. त्यानुसार सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर घालण्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा व त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक ती उपकरणे व साधने त्याचप्रमाणे प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक ती प्राण्यांच्या संबंधित नमुने आहोत. अशा प्रकारे प्राणीशास्त्र विभागाची प्रयोगशाळा सुसज्ज आहे.

विद्यार्थ्यांची प्राणीशास९ व त्याचप्रमाणे आत्मबल वाढविण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांना व्याख्यान व त्याचप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर परिषदेला पाठविण्यात आले. चालू असलेल्या शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्राध्यापक बांगरे एम.डी. व

प्राध्यापिका लहारे एन.टी. यांनी Biodersity of India in past, present & future यामध्ये सहभाग घेतला. येणाऱ्या वर्षातही प्राणीशास्त्र विभाग महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, प्राचार्य व उपप्राचार्य यांच्या संयोगाने प्राणीशास्त्र विभागाची यश संपादन करण्याची कार्यपध्दती चालु ठेवेल व विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देईल.

अशा प्रकारे महाविद्यालयामध्ये प्राणीशास्त्र विभाग कार्यरत आहे व पुढे ही असेच यश मिळवत राहिल.

**प्रा. बांगरे एस.डी.**

# इलेक्ट्रॉनिक्स विभाग अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ पासून झाली. त्यानंतर सन २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली. तेव्हापासून इलेक्ट्रॉनिक्स हा विभाग सुरु करण्यात आला आहे. या विभागांतर्गत प्रथम वर्षापासून ते द्वितीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहे. या विषयासाठी प्रथम वर्षाचे ३० विद्यार्थी व द्वितीय वर्षाचे २० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर घालण्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये उच्च प्रतिची उपकरणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच नविन संशोधन कार्यात विकास होण्यासाठी प्राध्यापकांना विविध संशोधन परिषदा व कार्यशाळांना पाठविण्यात येते.

अशा प्रकारे महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभाग कार्यरत आहे.

**प्रा. धर्माधिकारी एस.एस.**
**इलेक्ट्रॉनिक्स विभाग**

# बी.सी.ए. विभाग अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बी.सी.ए. अभ्यासक्रमाची सुरुवात शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून करण्यात आली.

बी.सी.ए.अभ्यासक्रमांतर्गत असणाऱ्या विविध विषयांत प्राविण्य असलेल्या प्राध्यापकांना विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी बोलविले जाते.

तसेच टी.वाय. बी.सी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यासाठी प्रोजेक्ट गाईडन्स करिता तज्ञ अध्यापकांना आमंत्रित करण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत संगणक लॅब उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये उत्कृष्ट प्रतिचे संगणक व प्रिन्टर उपलब्ध आहेत. तसेच युपीएस बॅक अप व ब्रॉडबॅण्ड इंटरनेट सुविधाही उपलब्ध आहेत. बी.सी.ए. अंतर्गत येणाऱ्या सर्व विषयांसाठी उच्च दर्जाच्या प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आली आहे.

तसेच नवीन टेक्नोलॉजी अवगत होण्यासाठी प्राध्यापकांना विविध वर्कशॉप, कार्यशाळा, सेमीनार, इ. मध्ये पाठवण्यात आले आहे.

शिक्षणाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना वाव मिळण्यासाठी विविध प्रकारच्या गेम्सचे आयोजन केले जाते. टी.वाय.बी.सी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट मार्गदर्शनाची व्यवस्था करण्यात आली.

हे सर्व करताना संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

**- प्रा. भुजबळ ए.आर.**
**बी.सी.ए. विभाग प्रमुख**

# ग्रंथालय विभाग अहवाल

अहवाल वर्षी ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा ५२७५ आहे. यावर्षी १,५०,०९९ किंमतीचे ८५० ग्रंथ खरेदी केलेले आहेत. यामध्ये विविध विषयांची संदर्भ पुस्तकांची भर घालण्यात आलेली आहे. ग्रंथालयात नियमित राष्ट्रीय व राज्यस्तरीय अशी २२ नियतकालिके नियमित येत असून त्यांच्या वर्गणीसाठी खर्च करण्यात आलेला आहे.

**❋ ग्रंथालयाचे विशेष उपक्रम –**

**❋ संदर्भ सेवा –** ग्रंथालयात विद्यार्थ्यांना विविध विषयांशी संबंधित संदर्भ पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात. प्राध्यापकांना सुध्दा संदर्भ सेवा दिली जाते.

**❋ नियतकालिका सेवा –** महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांच्या ग्रंथालयामध्ये नियतकालिक सेवा उपलब्ध करुन दिली जाते. ग्रंथालयामध्ये नियतकालिके विद्यार्थ्यांना वाचनासाठी दिली जाते.

**❋ करिअर गाईडन्स –** स्पर्धा परीक्षा विषयक अद्ययावत ग्रंथ नियतकालिके, प्रश्नसंच उपलब्ध करुन देण्यात आले.

**❋ कात्रण सेवा –** ग्रंथालयाने महत्वाच्या विषयावरील वृत्तपत्रातील लेखांची कात्रणे संग्रहित केली असून संबंधित अभ्यासक्रमांना, संशोधकांना ती उपलब्ध करुन दिली जाते.

**❋ इन्फिलबनेट ई रिसोर्स जर्नल्स सुविधा –** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अंतर्गत असणारे एनलिस्ट इलेक्ट्रॉनिक जर्नल्स उपलब्ध आहेत. यासाठी महाविद्यालयाने ५००० रु. वार्षिक वर्गणी भरलेली आहे.

**❋ ग्रंथालयाविषयी माहिती –** ❋ स्थापना – २००४, ❋ ग्रंथ संपदा – ५२७५. ❋ ऑडिओ–व्हिडिओ सीडीज् – २००. ❋ वृत्तपत्रे – आठ. ❋ नियतकालिके – २२. ❋ वाचक संख्या – १०००.

**❋ ग्रंथालय सुविधा –** रिडींग हॉल, होम लेडिंग, न्यूज पेपर, क्लिपींग संदर्भ सेवा, लोकल टेलिफोन.

**❋ नियतकालिके –**

❋ कला शाखा – १४.

❋ वाणिज्य शाखा – ०४.

❋ विज्ञान शाखा – ०४

❋ एकूण नियतकालिके – २२

**– प्रा. राऊत दत्तात्रय विलासराव**
**ग्रंथालय विभाग प्रमुख**

---

# शारिरिक शिक्षण क्रीडा विभाग अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये दरवर्षी विविध खेळामध्ये आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धात विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या उत्साहात सहभागी होतात. शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये विद्यार्थीनी पुढीलप्रमाणे सहभागी होवून क्रीडा क्षेत्रात यश सपांदन केले पुणे विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा –

१) आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धा पी.व्ही.पी. कॉमर्स कॉलेज प्रवरानगर येथे पार पडल्या त्यात विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता त्यांनी चांगली कामगिरी केली.

२) आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा सी.डी. जैन महाविद्यालयीन श्रीरामपूर येथे पार पउल्या त्यात पुढील विद्यार्थी सहभागी झाले होते. – १) बागवान सद्दाम – प्रथम क्रमांक. २) सागर गाठे – प्रथम क्रमांक. इरफान पठाण –तृतीय क्रमांक मिळविला. प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांची पुणे विद्यापीठ निवड विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी झाली.

३) आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन क्रीडा स्पर्धा न्यु लॉ कॉलेज, अ.नगर येथे पार पडल्या त्यात मुलांचा संघ सहभागी होवून चांगली कामगिरी केली.
४) आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा जिजामाता कला शास्त्र महाविद्यालय भेंडा येथ पार पडल्या त्यात विद्यार्थ्यांचा संघ सहभागी होवून संघाने चांगली कामगिरी केली.
५) कुस्ती आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा श्री ढोकेश्वर महाविद्यालय टाकळी ढोकश्वर येथे पार पडल्या. त्यात महाविद्यालयाचे ५ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली. १) योगेश वाघ, २) आढाव अमर –तृतीय क्रमांक.
६) आंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धा पेमराज सारडा महाविद्यालय, अ.नगर येथे पार पडल्या त्यात २ विद्यार्थी सहभागी होवून, १) धनंजय गायकवाड, याने – प्रथम क्रमांक मिळविला त्याची पुणे विद्यापीठ विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.
७) पॉवर लिफ्टींग वेट लिफ्टींग शरीर सौष्ठव – आंतर महाविद्यालयीन स्पर्धा सी डी जैन महाविद्यालय श्रीरामपूर येथे पार पडल्या त्यात – १) सचिन मकासरे – प्रथम क्रमांक. २) फिरोज पठाण – प्रथम क्रमांक. ३) इरफान पठाण – तृतीय क्रमांक. प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांची पुणे विद्यापीठ विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी झाली.

**पुणे विद्यापीठ आंतर विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी.**

**१) बॉक्सिंग –** पुणे विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धा एम.आयटी कॉलेज लोणी काळभोर येथे पार पडल्या त्यात – १) सद्दाम बागवान, २) सागर गाठे, यांची निवड होवून चांगली कामगिरी केली.

**२) ज्यदो –** पुणे विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धा नाशिक येथे पार पडल्या त्यात धनंजय गायकवाड याची निवड होवून त्याने द्वितीय क्रमांक मिळविला.

**३) वेट व पॉवर लिफ्टींग शरीर सौष्ठव –** पुणे विद्यापीठ आंतर विभागीय स्पर्धा सी.डी. जैन महाविद्यालय श्रीरामपूर येथे पार पडल्या. त्यात १) सचिन मकासरे – प्रथम क्रमांक. २) फिरोज पठाण – तृतीय क्रमांक प्राप्त केला.

ज्युदो – महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धा नांदेड येथे पार पडल्यात त्यात धनंजय गायकवाड याची निवड होवून उत्कृष्ठ कामगिरी केली.

कला व शास्त्र महाविद्यालय पारनेर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. पुंडे मनिषा यांनी ताणतणावाचे व्यवस्थापन व अभ्यास या विषयावर शोध निंबध सादर केला व तो त्यांच्या स्मरणिकेत प्रकाशितही झाला.

महाराष्ट्र राज्य व केंद्र सरकार (आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा (पापका)) पारितोषिक वितरण प्रसंगी डीग्रस संगमनेर येथे प्रमुख अतिथी म्हणून प्रा. पुंडे मनिषा यांनी मार्गदर्शन केले.

या बरोबरच श्रीसमर्थ विद्यामंदिर प्रशाला व सेक्रेड हार्ट कॉन्व्हेन्ट स्कूलमध्ये क्रीडा मेळावा पारितोषिक वितरण प्रसंगी मार्गदर्शन केले.

तसेच न्यु आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर येथे निर्भय कन्या अभियान कार्यक्रमात प्रा. पुंडे मनिषा यांनी स्वसंरक्षण प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले व मार्गदर्शन केले.

**– प्रा. पुंडे मनिषा**
**शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख**

# बहि:शाल शिक्षण मंडळ वार्षिक अहवाल २०१५-१६

आपल्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व बहि:शाल शिक्षण मंडळ व बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने हा विभाग कार्यरत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये या विभागाच्या वतीने महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला आणि यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालाचे आयोजन अनुक्रमे ११ ते १३ जाने. व १८ ते २० जाने. २०१६ या कालावधीत करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प डॉ. एम.डी. कुलकर्णी यांनी गुंफले. त्यांच्या व्याख्यानाचा विषय नाटक एक प्रवास हा होता. आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी नटसम्राट या नाटकातील स्वगत सादर करुन विद्यार्थ्यांना आपल्यामधील अभिनय कौशल्य दाखविले. विनोदी किस्से, कविता, नाटकातील स्वगत सादर करुन हसता हसता उपस्थितांना आत्मपरिक्षण करण्यास भाग पाडले.

या व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प राहुरी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुर्यकांत गडकरी यांनी गुंफले. त्याच्या व्याख्यानाचा विषय सकारात्मक विचारसरणी आणि व्यक्तीमत्व विकास हा होता. गमतीदार गोष्टी, प्रेरक प्रसंग सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक विचारसरणी अनुसरण्यास मार्गदर्शन केले.

डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी गुंफले. त्यांच्या व्याख्यानाचा विषय कवितेच्या गावा जावू हा होता. कवितांमधून त्यांनी स्वानुभव कथन केले. अतिशय हालाखीच्या परिस्थितीचा सामना करत असतानाही शिक्षणाची कास त्यांनी सोडली नाही. माणसाच्या मनामध्ये प्रबळ इच्छाशक्ती, असेल तर प्रतिकूल परिस्थितीही माणसापुढे शरण येते हे डॉ. उपाध्येंनी आपल्या व्याख्यानामधून विद्यार्थ्यांसमोर मांडले.

बहि:शाल शिक्षण मंडळातर्फे महाविद्यालयात दि. १८ ते २० जाने. २०१६ या कालावधीत यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला आयोजित केली होती. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प श्री. संजय गोर्डे यांनी गुंफले. त्यांच्या व्याख्यानाचा विषय हसण्यासाठी जन्म आपुल्या हा होता. माणसाला जीवनात यशस्वती होण्यासाठी सतत आनंदी, सकारात्मक आणि कल्पक असणे आवश्यक असते हा संदेश त्यांनी वेगवेगळ्या उदाहरणांमधून विद्यार्थ्यांना दिला.

दि. १९ जाने. २०१६ रोजी या व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प जेष्ठ कलाकार सुरेंद्र गुजराथी यांनी गुंफले. यांनी वाह! क्या बात है हा एकपात्री प्रयोग सादर केला.

या व्याख्यानमालेचे शेवटचे आणि तिसर पुष्प अकोले तालुक्यातील सामाजिक कार्यकर्त्या सौ. अनुराधा अंकुश आहेर यांनी गुंफले. त्यांच्या व्याख्यानाचा विषय टी.व्ही., मोबाईल, इंटरनेट आणि आपण हा होता. आपल्या व्याख्यानात त्यांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा समाज मनावर होणारे परिणाम, माध्यमांच्या आहारी गेलेला मनुष्य महाविद्यालयीन आणि शाळकरी मुला मुलींवर होणारे दुष्परिणाम या विषयी उपस्थितांशी संवाद साधला.

या व्याख्यानमालेचा समारोप दि. २० जाने. २०१६ रोजी पार पडला. समारोपाच्या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक जाधव, उपप्राचार्य डॉ. विजय जाधव, कला शाखा विभाग प्रमुख डॉ. भाऊसाहेब मुळे, डॉ. वर्षा किर्तने, प्रा. मनीषा पुंडे, प्रा. प्रविण नागवडे व इतर सहकारी शिक्षक शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अशा पध्दतीने या शैक्षणिक वर्षात बहि:शाल शिक्षण मंडळातर्फे महाविद्यालयात वरील दोन व्याख्यानमाला यशस्वीपणे राबविण्यात आल्या.

**- प्रा. प्रविण सी. नागवडे**
**केंद्रकार्यवाह, बहि:शाल शिक्षण विभाग**

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयमध्ये शैक्षणिक वर्ष २००४–२००५ या वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना एकक कार्यरत आहे. २०१५–२०१६ या शैक्षणिक वर्षामध्ये १०० विद्यार्थ्यांचे एकक कार्यरत आहे. यामध्ये ५५ मुले ४५ मुली सहभागी आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१५–१६ या वर्षामध्ये जुलै महिन्यात नियमित कार्यक्रमास सुरुवात झाली. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती देण्यात आली व या अंतर्गत केल्या जाणाऱ्या विविध समाजसेवा व इतर कामाविषयी माहिती देण्यात आली.

✻ **नियमित कार्यक्रमांतर्गत राबविलेले उपक्रम** : राष्ट्रीय सेवा योजनेचे नियतकालिक कार्यक्रमानुसार महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवणे, क्रीडांगण तयार करुन अद्ययावत ठेवणे. वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे, विविध प्रकारच्या वनस्पती व फळांच्या बिया जमा करणे, प्रौढ व निरंतर शिक्षण देणे, रस्ता दुरुस्ती व ग्राम स्वच्छता करणे व विविध समाजोपयोगी कामे केली जातात.

✻ **विशेष शिबीर** : राष्ट्रीय सेवा योजनेचा महत्वाचा उपक्रम म्हणजे विशेष शिबीर होय. शैक्षणिक वर्ष २०१५–१६ चे विशेष शिबीर दि. १०/१२/२०१५ ते १६/१२/२०१५ या कालावधीमध्ये मु.देवगाव, ता.जि. अहमदनगर या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या शिबीरामध्ये एकूण ५० विद्यार्थी विद्यार्थीनीनी सहभाग घेतला होता.

✻ **शिबीरातील उपक्रम** : शिबीर कालावधीमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करणे, वृक्षारोपण करणे, गावातील घन व द्रव कचऱ्याचे व्यवस्थापन करणे, महिला जनजागृती, महिला सबलीकरण व सक्षमीकरण, नैसर्गिक साधने, संवर्धन सांस्कृतिक, ऐतिहासिक स्थळ जपवणूक व इतिहास लेखन युवा संलग्नीकरण उपक्रम राबविणे, भौगोलिक माहिती तयार करणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाकरिता स्वच्छतागृह खड्डे बांधणे, वनराई बंधारे अशा प्रकारे राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक चांगल्या प्रकारे कार्यरत आहे.

**– प्रा. साठे बी.जी.**
**राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी**

# कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना अहवाल २०१५-१६

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे पण ज्यांना शिकण्याची आकांक्षा आहे असे विद्यार्थी 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा लाभ घेऊ शकतात. श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २००५ सालापासून ही योजना कार्यरत असून त्यात ६५ मुले व मुलींचा सहभाग असून आपले शिक्षण घेत आहेत आणि ह्याच उद्देश कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा आहे.

या योजनेतून विद्यार्थ्यांना फक्त आर्थिक मदतच होत नाही तर अनेक कामे करण्याची संधी मिळते. ग्रंथालय विभाग परीक्षा विभाग, संगणक विभाग, विज्ञान प्रयोगशाळा, कार्यालय व बागकाम अशा विविध विभागांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांना अभ्यासाबरोबर इतर विभागांचेही ज्ञान मिळते तसेच विद्यार्थ्यांचा श्रमसंस्काराचे महत्वव कळाले.

**- प्रा.डॉ.सौ. कीर्तने व्ही.एस्.**
**कमवा व शिका योजना**

# विद्यार्थी कल्याण मंडळ विभाग अहवाल २०१५-१६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ आणि श्री बाणेश्वर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बुऱ्हाणनगर यांच्या वतीने विद्यार्थी कल्याण मंडळ विभाग महाविद्यालय कार्यरत आहे.

या विभागाच्या वतीने महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना विशेष मार्गदर्शन योजना आणि विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजना इ. योजना राबविल्या जातात.

विशेष मार्गदर्शन योजनेअंतर्गत महाविद्यालयातील सर्व शाखांच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांच्या तज्ञांची व्याख्याने आयोजित केली गेली. यामध्ये अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतरही विषयावरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजने अंतर्गत २९ जानेवारी २०१६ रोजी कार्य शाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयातील १०५ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला या कार्यशाळेसाठी डॉ. प्रशांत बनसोडे, गोखले इन्स्टिट्युट पुणे तसेच डॉ. माणिक सोनवणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे व प्रा. कस्तुरे न्यू आर्टस् महाविद्यालय अहमदनगर येथील प्रमुख व्याख्याने उपस्थित होते.

२८ जानेवारी या दिवशी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या वेळीही विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले अशा प्रकार महाविद्यालयामध्ये विद्यार्थी कल्याण मंडळ कार्यरत आहे.

**प्रा.डॉ. शेख आर. एच.**
**विद्यार्थी कल्याण अधिकारी**